


RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - ७६ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ शनिवार दि. १२ एप्रिल २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## स्वत:ला आलमगीर म्हणणारा महाराष्ट्रातच पराभूत झाला इथंच त्याची कबर; अमित शाहांनी रायगडावरुन डागली तोफ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२रायगड**

स्वत:ला आलमगीर म्हणवणारा इथेच महाराष्ट्रात पराभूत झाला आणि इथेच त्याची कबर खोदली. मी महाराष्ट्राच्या जनतेला हात जोडून विनंती करायला आलोय. शिवरायांना महाराष्ट्रापुरतं मर्यादित ठेवू नका, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांची ३४५ व्या पुण्यतिथीनिमित्त गृहमंत्री अमित शाह यांनी आज किल्ले रायगडावर जाऊन शिवरायांना वंदन केले. यावेळी ते बोलत होते.




केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, मी आतापर्यंत अनेक युगपुरुषांचे जीनव चरित्र वाचले आहेत. पण, प्रचंड इच्छाशक्ती, धाडस, अकल्पनीय रणनिती आणि रणनीती पूर्ण करण्यासाठी समाजातील प्रत्येक वर्गाला एकत्र जोडून अपराजित सेनेची निर्मीती केली. हे शिवछत्रपतींशिवाय कोणीच केलेले नाही. त्यांच्याकडे संपत्ती नव्हती, ना त्यांच्यासोबत भाग्य होते, सेना नव्हती एक मुलगा धाडसाच्या जीवावर पूर्ण देशाला स्वराज्यचा मंत्र देऊन गेले. बघता बघता त्यांनी २०० वर्षे असलेल्या मुघलशाहीला पराभूत करुन देशाला स्वतंत्र करण्याचे काम केले, असंही अमित शाह म्हणाले. ज्यावेळी अटकपर्यंत मावळ्यांची सेना पोहोचली, बंगाल, तामिळनाडूपर्यंत सेना पोहोचली तेव्हा सगळ्यांना आपला देश वाचला असे वाटले. आमची भाषा, संस्कृती वाचली. आज आपल्या स्वातंत्र्याला १०० वर्षे पूर्ण होतील तेव्हा देश नंबर एकला असणार आहे, असंही अमित शाह म्हणाले.

**आलमगीरची कबर महाराष्ट्रातच...**

अमित शाह म्हणाले, जिजाऊंनी बाल शिवाजी यांच्यावर संस्कार केले. शिवाजी महाराजांनी त्या संस्काराचा वटवृक्ष बनवला आणि त्यानंतर धर्मवीर संभाजी महाराज, महाराणी ताराबाई, धनाजी, संताजी. शिवाजी महाराजांनंतर औरंगजेब जोपर्यंत जीवंत राहिला तोपर्यंत ते त्याच्याविरोधात लढत राहिले. स्वत:ला आलमगीर म्हणणारा व्यक्ती महाराष्ट्रात पराभूत होऊन इथेच त्याची कबर बांधली, असंही अमित शाह म्हणाले.

## मुंबईच नव्हे, इतर शहरांतही हल्ले करण्याचे राणाचे कारस्थान होते, धक्कादायक माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ नवी दिल्ली**


मुंबईवरील २६/११च्या दहशतवादी हल्ल्यातील मुख्य आरोपी तहव्वूर राणा याची राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) १८ दिवसांच्या कोठडीच्या कालावधीत सखोल चौकशी करणार आहे. त्याने केवळ मुंबईच नव्हे तर भारतातील इतर शहरांमध्येही दहशतवादी हल्ले घडविण्याचा कट आखला होता असा युक्तिवाद एनआयएने दिल्लीतील न्यायालयात केला. हल्ल्याचा कट आखताना पाकिस्तानची गुप्तहेर संघटना आयएसआय तसेच कोणकोणते दहशतवादी गट सामील होते याची माहिती त्याच्याकडून मिळविली जाणार आहे.



राणाशी आमचा कोणताही संबंध नाही, असे सांगून पाकिस्तानने हात झटकले आहेत. मात्र त्या देशाला आंतरराष्ट्रीय स्तरावर उघडे पाडण्यासाठी राणाचा जबाब अतिशय महत्त्वाचा आहे. तहव्वूर राणा याचे अमेरिकेतून गुरूवारी (दि. १०) संध्याकाळी भारतात प्रत्यार्पण केल्यानंतर त्याला एनआयएने अटक केली. त्यानंतर दिल्लीतील पतियाळा हाउस येथील एनआयएच्या विशेष न्यायालयात राणाला हजर केल्यानंतर न्यायमूर्ती चंदरजीत सिंग यांनी त्याला १८ दिवसांची कोठडी दिली. एनआयएने त्याला २० दिवसांची कोठडी द्यावी, अशी विनंती केली होती.६४ वर्षीय राणा हा पाकिस्तानचा मूळ रहिवासी असून, त्याने नंतर कॅनडाचे नागरिकत्व पत्करले. तो मुंबई हल्ल्याच्या कटाचा सूत्रधार डेव्हिड कोलमन हेडलीचा (ऊर्फ दाऊद गिलानी) निकटवर्तीय आहे. राणाने प्रत्यार्पणाविरोधात केलेला अर्ज अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाने ४ एप्रिल रोजी फेटाळला होता. तहव्वूर राणाला एनआयए मुख्यालयात १८ दिवसांच्या कोठडीत ठेवण्यात आले आहे. त्यामुळे या मुख्यालयाच्या परिसरातील सुरक्षा व्यवस्था आणखी कडक करण्यात आली आहे. दिल्ली पोलिसांचे स्पेशल वेपन्स अँड टॅक्टिक्स पथकही तिथे तैनात करण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १६ एप्रिल रोजी होणार अमरावती विमानतळाचे लोकार्पण

### महाराष्ट्र एअर डेवलपमेंट कंपनीच्या संचालिका स्वाती पांडे यांनी दिली माहिती




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

गेल्या अनेक वर्षांपासून बहुप्रतिक्षेत असलेल्या अमरावती (बेलोरा) विमानतळाचे १६ एप्रिल रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते लोकार्पण होणार असून उपमुख्यमंत्री अजित पवार,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित राहणार आहेत.

आठवड्यातुन सोमवार बुधवार आणि शुक्रवार असे तीन दिवस अमरावतीकरांना विमानवारी करता येणार आहे. अलायन्स एअर लाईनच्या संकेत स्थळावर वेळापत्रक जारी करण्यात आले आहे अशी माहिती आज महाराष्ट्र एअर डेवलपमेंट कंपनी च्या संचालिका स्वाती पांडे व जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी विमानतळावर घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

अमरावती विमानतळ विदर्भाच्या अर्थव्यवस्था, व्यापार,पर्यटन आणि हवाई संपर्कासाठी गेम चेंजर ठरणार असून महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी उडाण योजनेंतर्गत विकसित हे विमानतळ केवळ पायाभूत सुविधा नव्हे,तर उद्योग,व्यवसाय आणि प्रवासासाठी सुवर्णद्वार ठरणार आहे असे जिल्हाधिकारी सौरभ यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी अंतर्गत अमरावती विमानतळ हे राज्यातील तिसरे व्यावसायिक विमानतळ आहे.

**मुंबई–अमरावती–मुंबई असा विमानसेवा करार**

प्रादेशिक संपर्क योजना उडानअंतर्गत व्यावसायिक विमानसेवा अमरावती विमानतळाहून सुरू होत आहे. त्यानुसार आठवड्यातून तीन दिवस अमरावतीकरांना मुंबईने विमानवारी करता येईल, असे वेळापत्रक अलायन्स एअर लाइन्सने जारी केले आहे. अमरावती विमानतळावर अत्याधुनिक पायाभूत सुविधा, नेव्हिगेशन प्रणाली आणि ग्राउंड हैंडलिंगची चाचपणी चमूद्वारे झालेली आहे. अलाइन्स एअर लाइनच्या करारानुसार मुंबई–अमरावती–मुंबई अशी विमानसेवा असणार आहे.तर येत्या काळात पुणे,नवी दिल्ली ही विमान सेवा सुरु करण्याची तयारी सुरु ज़ली असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## संतोष देशमुखांना मारण्यासाठी ४ जीवघेण्या हत्यारांचा वापर अंगावर १५० जखमा; रिपोर्टमध्ये धक्कादायक माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२बीड**

संपूर्ण राज्य आणि देशाचे लक्ष वेधून घेतलेल्या संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबंधित एक महत्वाची माहिती समोर आली आहे. सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. त्यांचे अपहरण केल्यानंतर त्यांना मारण्यासाठी चार जीवघेण्या शस्त्रांचा वापर करण्यात आला असा उल्लेख परीक्षण अहवालात करण्यात आला आहे. गॅसचा पाइप, पाईपाचा चाबूक, लाकडी बांबूची काठी आणि लोखंडी पाइपाचा यात समावेश होता. या हत्यारांच्या सहाय्याने संतोष देशमुख यांना आरोपींनी अमानुष मारहाण केली. दरम्यान, हा अहवाल न्यायालयात सादर करण्यात आला आहे.



चारही हत्यारे कराड गँगने तयार केली आहेत असा उल्लेख या अहवालात करण्यात आला आहे. या हत्यारांच्या मदतीने संतोष देशमुख यांना बेदम मारहाण करण्यात आली. संतोष देशमुख यांच्या शरीरावर १५० जखमा आढळल्या होत्या. इतकी अमानुष मारहाण त्यांना झाली होती. आरोपींनी याआधीही याच हत्यारांना अन्य व्यक्तींना देखील मारहाण केली होती. मिळालेल्या माहितीनुसार सरपंच संतोष देशमुख् यांना मारण्यासाठी वापरण्यात आलेल्या चार हत्यारांचा परीक्षण अहवाल समोर आला आहे. यामध्ये गॅस पाइप, पाइपाचा चाबूक, बांबूची काठी, लोखंडी पाइप या हत्याराने देखील देशमुख यांना मारहाण केली होती. त्यानंतर त्यांचा मृत्यू झाला होता.

## विटांनी भरलेला ट्रक दुचाकीवर उलटला ढिगाऱ्याखाली दबून ५ जण ठार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अकोला**



अकोल्यात विटांनी भरलेला ट्रक दुचाकीवर उलटल्याने मोठी दुर्घटना घडली. या घटनेत पाच जणांचा मृत्यू झाला आहे. तर, दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना अकोला–मंगरूळपीर रोडवर दगडपारवा गावाजवळ आज घडली. विटांचा ट्रक उलटल्याचे कळताच परिसरात एकच खळबळ माजली.

अकोल्यात गडपारवा गावाजवळ विटांचा ट्रक दुचाकीवर उलटला. या घटनेत अनेकजण विटांच्या ढिगाऱ्याखाली अडकले. घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेऊन ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांना बाहेर काढले. या घटनेत पाच जणांचा मृत्यू झाला आहे. तर, दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना अकोला जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृतांमध्ये ट्रकमधील चार जणांचा समावेश आहे.

## महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांची खैर नाही फडणवीस यांनी दिले कायदा करण्याचे संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १२रायगड**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांना कठोर शासन करण्याप्रकरणी एक कायदा करण्याचे संकेत दिले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारख्या महापुरुषांचा अपमान करणाऱ्यांना खरेतर टकमक टोकावरून लोटले पाहिजे. पण आपल्याकडे लोकशाही आहे. त्यामुळे या प्रकरणी निश्चित असे काही नियम तयार केले जातील, असे ते म्हणालेत.



केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारी रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. यावेळी आयोजित कार्यक्रमात बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अमित शहा रायगडावर केवळ केंद्रीय गृहमंत्री म्हणून आले नाहीत, तर ते छत्रपती शिवरायांचे सेवक आणि मराठा इतिहासाचे एक संशोधक म्हणून आलेत. रघूजी राजे आंग्रे यांनी योग्य सांगितले. ज्यावेळी संपूर्ण देशात मोगलाई, कुतूबशाही, आदिलशाही होती. त्यावेळी या देशातले राजे आणि राजवाडे भंग पावत होते. मोडकळीस येत होते. लढून संपत होते. वाटत होते परकीय आक्रमकांचे राज्य संपणार नाही. तेव्हा आई जिजाऊंच्या आशीर्वादाने छत्रपती शिवरायांसारखा एक सूर्य उगवला. ते नसते तर आपण कुणीच नसतो. त्यांच्यामुळे आपण देश आणि धर्माचे काम करत आहोत.

## राज्यातील शिक्षकांसाठी शिक्षणमंत्र्यांनी दिली आनंदाची बातमी; आता ताण होणार कमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नंदुरबार**

लोकसभा निवडणुका, विधानसभा निवडणुका, स्थानिक पातळीवरील निवडणुका आल्या की शिक्षकांना कामं लागतात हे ठरलेलंच आहे. तसंच सरकारी योजनांचा आढावा, माहिती जनतेपर्यंत पोहचवण्याची कामंही शिक्षकांना दिली जातात. त्यामुळं मुलांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याच्या अनेक तक्रारी पालकांकडून होत असतात. यावर आता निर्णय घेणार असल्याची माहिती शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली.

अशैक्षणिक कामं कमी करण्याचा निर्णय : राज्यातील शिक्षकांची किमान ५० टक्के अशैक्षणिक कामं कमी करण्याचा निर्णय येत्या १५ दिवसातच घेण्यात येईल, जि.प. शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होत आहे. यामुळे विद्यार्थ्यांची पटसंख्या टिकविण्याचे आव्हान आहे. यासाठी शाळांमधील गुणवत्ता



सुधारण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. बहुसंख्य जिल्हा परिषद शिक्षक नवीन उपक्रम राबवून गुणवत्ता वाढवीत आहेत, ते राज्यभरातील शाळांमध्ये अंमलबजावणी करु व राज्यात अशा शिक्षकांची 'आयडॉल बँक' तयार करण्याचा मानस समोर ठेवला आहे. सुट्ट्यांमध्ये जिल्हा परिषद शिक्षकांनी पालकांशी संवाद साधून नवीन उपक्रमांबाबत पालकांना माहिती द्यावी, जेणेकरून पटसंख्या वाढीत मदत होईल व जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता व पटसंख्या टिकून राहील, यासाठी सर्व शिक्षकांनी प्रयत्नशील राहावे, असं आवाहन राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केलं.

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये राबविले जाणारे उपक्रम नाविन्यपूर्ण असतात. मात्र याबाबत पालकांना पुरेशी माहिती नसते. यामुळे सुट्ट्यांमध्ये पालकांशी संवाद साधा. राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती द्या, अनेक शाळा लोकसहभागातूनच उभ्या राहिल्या आहेत. शाळेत गुणवत्ता असल्याचे पालकांना जाणीव झाल्यास नक्कीच पटसंख्या वाढीसाठीदेखील मदत होणार असल्याचा विश्वास मंत्री भुसे यांनी व्यक्त केला.

## अपघातग्रस्ता साठी देवदूत ठरले आ. प्रताप अडसड : जखमींना नेले आपल्या वाहनात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२धामणगाव रेल्वे**

अमरावती चांदूर रेल्वे रोड वर एका ट्रक चालकाने कार ला चिरडले या अपघातात दोन लहान मुले एक महिला व दोन जेष्ठ पुरुष जखमी झाले यावेळी रस्त्याने जात असलेले आ प्रताप अडसड जखमीसाठी देवदूत ठरले आपल्या वाहनातून जखमींना अमरावती खाजगी रुग्णालयात दाखल केले. ही घटना शनिवारी दुपारी साडेतीन वाजता वाघामाय मंदिराजवळ घडली.अमरावती येथील काही भाविक आज दर्शनासाठी सावंगा विठोबा येथे चारचाकी वाहनाने गेले अमरावती कडे जात असताना एका ट्रॅक ने चार चाकी वाहनाला धडक दिली त्यात चार वाहनातील



पाच जण गंभीर जखमी झाले घटना स्थळी जखमी जखमी पडले होते आमदार प्रताप अडसड हे आपल्या धामणगाव रेल्वे मतदार संघात जात असताना घटना स्थळी थांबले ही भीषण घटना पाहून पोलीस प्रशासनाला तत्काळ कळविले यावेळी कोणाचीही वाट न पाहता स्वतः च्या आपल्या गाडीततून घेऊन जाऊन या रुग्णांना खाजगी दवाखान्यात दाखल केले

## संपादकीय ......

# ट्रम्प यांना चपराक

अमेरिकेची परंपरागत धोरणे आमूलाग्र बदलण्याचा आग्रह धरणार्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना तेथील सर्वोच्च न्यायालयाने सणसणीत चपराक लगावली. अमेरिकेतर्फे विविध देशांना दिली जाणारी दोन अब्ज डॉलरची परकीय मदत थांबवण्याचा ट्रम्प यांचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने ५ विरुद्ध ४ मतांनी फेटाळून लावला. जागतिक आरोग्य, कुटुंबकल्याण, शिक्षण वगैरे क्षेत्रांत काम करणार्या स्वयंसेवी संस्थांना अमेरिकन सरकार तसेच यूएस एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंटतर्फे (यूएसएआयडी) मदत केली जाते. यामुळे लाखो लोकांचे जीव वाचतात, तसेच काही प्रमाणात अमेरिकेची प्रतिमाही चांगली होते, असा युक्तिवाद न्यायालयात करण्यात आला होता. अमेरिकेतील अनेक स्वयंसेवी संस्थांनीही या बंदीला आव्हान दिले होते; मात्र यूएसएआयडी ही संस्था कट्टरपंथी लोक चालवतात, अशी टीका ट्रम्प यांनी केली होती. मस्क यांनी तर तिला 'गुन्हेगारी संघटना' संबोधून ती नष्ट केली पाहिजे, असे म्हटले होते. ट्रम्प यांनी सत्तेवर आल्या आल्या बांगला देशला दिली जाणारी मदतही थांबवली. बांगला देशचे हंगामी प्रमुख मोहम्मद युनूस हे अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन व बिल क्लिंटन यांचे मित्र आहेत, या एकमेव निकषावर ट्रम्प यांनी हा निर्णय घेतला. त्यांनी भारताला दिली जाणारी २.१ कोटी डॉलरची मदतही रोखली. भारत प्रचंड कर आकारून तुफान महसूल गोळा करतो, तेव्हा त्यांच्या मदतीला धावून जायचे काही कारण नाही, असा त्यांचा युक्तिवाद आहे. तीन दशकांपूर्वी ज्या अमेरिकेने जागतिक व्यापार संघटनेच्या (डब्ल्यूटीओ) माध्यमातून जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान केली, तीच अमेरिका आज घड्याळाचे काटे उलटे फिरवू लागली आहे.


ट्रम्प यांनी कॅनडा, मेक्सिको आणि चीनवर आयात शुल्क लागू करण्याची निवडणूक प्रचारातच दिलेली धमकी लगोलग प्रत्यक्षात अमलात आणली. मेक्सिको आणि कॅनडामधील वस्तूंवर कोणत्याही विलंबाविना २५ टक्के आयात शुल्क वसुलीला सुरुवातही झाली. अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर चीनमधील वस्तूंची आयात केली जाते. फेब्रुवारीमध्ये या मालावर १० टक्के कर लागू करण्यात आला होता. तो आता दुप्पट करण्यात आला. प्रत्युत्तरादाखल चीनने विविध प्रकारच्या अमेरिकी मालावर १५ टक्के आयात शुल्क लावण्याचे जाहीर केले. तसेच जागतिक व्यापार संघटनेत अमेरिकेविरोधात कायदेशीर प्रक्रिया सुरू केली. अमेरिकेच्या या पवित्र्याने दोन्ही देशांतील व्यापारयुद्ध पेटले आहे. ट्रम्प यांनी कारकिर्दीच्या पहिल्या पर्वातही चीनसोबत व्यापार संघर्ष सुरू केला होता. चीननेही अमेरिकेतून आयात केलेले चिकन, गहू, मका आणि कापसावर ज्यादा शुल्क लागू केले, तसेच सोयाबीन, डुकराचे मांस, गोमांस, ज्वारी, फळे, भाज्या, डेअरी उत्पादनांवरही अतिरिक्त १० टक्के आयात शुल्क लावले. कॅनडा आणि मेक्सिकोतून अमेरिकेस येणार्या मालावर २५ टक्के नवे कर लागू करण्यात आले. याचा अर्थ अमेरिकेतील लोकांना गॅस, कार, काचेच्या वस्तू खरेदी करण्यासाठी आता जादा पैसे मोजावे लागतील. खरे तर, अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडातील करारानुसार, बहुतेक वस्तूंवर कर लागू नाही; पण आता या तिन्ही देशांच्या अर्थव्यवस्थांवर प्रतिकूल परिणाम होणार आहे. कारण, अमेरिकेने करांची करवत चालवल्यामुळे आम्हीही जशास तसे उत्तर देऊ, अशी घोषणा कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो तसेच मेक्सिकोच्या अध्यक्षा क्लॉडिया शिनबाऊ यांनी केल्याने हा आर्थिक वाद आणखी चिघळणार, हे स्पष्ट आहे.

खरे तर, भांडवलशाहीत स्पर्धा निर्माण होते आणि त्यामुळे वस्तूंच्या किमती कमी होऊन ग्राहकांचे कल्याण होते. तसेच उत्पादनवाढ व रोजगाराला चालना मिळते, या अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथच्या सिद्धांताचा प्रचार अमेरिकेतर्फे केला जात होता. विकसनशील देशांनी आपली बाजारपेठ अमेरिका व पाश्चात्त्य प्रगत राष्ट्रांसाठी खुली करावी, असा दबाव आणला जाऊन जागतिक व्यापार करारावर अनेक गरीब देशांच्या स्वाक्षर्या घेण्यात आल्या; पण आता अमेरिकाच जागतिकीकरणाच्या विरोधात धोरणे राबवत आहे. आता २ एप्रिलपासून भारतावरही आयात शुल्क लागू करणार असल्याची घोषणा ट्रम्प यांनी काँग्रेसमध्ये केलेल्या पहिल्या वार्षिक भाषणात केली आहे. अमेरिकी मालावर भारत १०० टक्के इतके जास्त आयात शुल्क लादतो, अशी तक्रार त्यांनी या भाषणात केली. २०२४ मध्ये अमेरिकेचा भारतासोबत १२९ अब्ज डॉलर इतका व्यापार होता. अमेरिकेची भारतात सुमारे ४१ अब्ज डॉलर इतकी निर्यात असून, भारताची अमेरिकेला केली जाणारी निर्यात ८७ अब्ज डॉलर इतकी आहे. गतवर्षी अमेरिकेची भारतासोबतच्या व्यापारातील तूट ४५ अब्ज डॉलर इतकी होती. जागतिकरणाचे पर्व सुरू झाल्यानंतर उत्पादन क्षेत्रातील अनेक अमेरिकी कंपन्यांनी स्वस्त मानवी श्रम आणि शिथिल कायदे असणार्या देशांत उत्पादन हलवले. अनेक बहुराष्ट्रीय औषध, शीतपेय तसेच इलेक्ट्रॉनिक कंपन्यांनी भारतीय बाजारपेठेत हातपाय पसरून फायदा घेतला. भारतासारखी विशाल बाजारपेठ मिळाली नसती, तर अमेरिकी कंपन्यांच्या मालाला उठाव मिळाला असता का, हा प्रश्न ट्रम्प यांना पडत नाही. आता अमेरिकेच्या 'रेसिप्रोकल टॅरिफ्स'मुळे भारताच्या शेती क्षेत्रास फटका बसू शकतो. अमेरिकेतून येणार्या शेतीमालावर भारताने उच्च कर लावले असून, त्यांचे सरासरी प्रमाण ३९ टक्के इतके आहे. उलट अमेरिकेत भारतातून जो शेतीमाल येतो, त्यावर सरासरी ५ टक्के कर होता. त्यामुळे अमेरिकेने भारतातून येणार्या मालावर प्रतिघाती कर लादल्यास भारताच्या शेतीमाल निर्यातीस फटका बसू शकतो. हे नुकसान कमी व्हावे, या दृष्टिकोनातून भारताने बदाम, अक्रोड, मका यावरील आयात शुल्क कमी केल्यास त्यामुळे भारताचे फारसे नुकसान होणार नाही. या संकटावर मात करण्याचा दुसरा उपाय म्हणजे, भारताने अमेरिकेशिवाय अन्य बाजारपेठांत शिरकाव करून घेण्यासाठी कसोशीचा प्रयत्न करणे. ट्रम्प यांच्या आत्मघातकी धोरणांमुळे अमेरिकेतील महागाई वाढणार आहे. त्याविरोधात तेथील जनतेमधून आवाज उठण्यास सुरुवात झाल्यावर ट्रम्प यांचे डोके ताळ्यावर येऊ शकेल.

विदर्भ प्रजासत्ताक

# श्रीरामभक्त हनुमान जयंती

श्री.प्रभूरामचंद भक्त हनुमान जयंती उद्या सर्वत्र आपण साजरी करतो आहे.हनुमानाला मारुती, बजरंगबली, रामभक्त, अंजनय, महावीर, महाबली,पवनसुत, पवनपुत्र ,केसरीनंदन अशा अनेक भक्ती नावाने संबोधले जाते, पूजले जाते, भक्ती केली जाते .



हनुमानाला शक्ती,पूर्ती आणि ऊर्जेचे प्रतीक व संकट मोचन म्हणजेच संकटातून मुक्त करणारे, संकटकाळी धावून येणारे मानले जाते. अशी आप आपली मोठी श्रद्धा त्यांचे भक्तांचेमध्ये आहे.

श्रीरामभक्ती जी हनुमान जी ने केली ती भक्ती, समर्पण आणि शक्तीचा अर्थ व बोध हनुमानजी चा जीवनातून आपल्याला शिकायला मिळतो. जो आपण प्रसिद्ध रामायण या या मालिकेतून बघितली आहे.

त्याचा बोध असा की आपण आपल्या जीवनात भक्ती आणि समर्पण ठेवून कोणत्याही अडचणीवर मात करू शकतो. हनुमानजी ला संकट मोचन म्हणून भक्त त्यांचे चरणी प्रार्थना करत असतो.

हनुमानजी जन्माचा उत्सव मोठ्या जल्लोषात सर्वत्र साजरा केला जातो. श्रीरामावरील असीम भक्ती आणि त्यांच्या अफाट शक्ती साठी ओळखले जाणारे हनुमान हे ध्येय ,निस्वार्थ सेवा भक्तीचे प्रतीक आहे .

**रामाचा भक्त तू !वाऱ्याचा पुत्र तू! शत्रूची करतोस दानादान**

**तुझ्या हृदयात फक्त सिताराम**

अशा बजरंगबली ला हनुमानजी ला माझा कोटी कोटी प्रणाम

श्रीराम भक्त हनुमान जयंती भारत देशात व काही इतर देशात सर्वत्र उत्साहात ,आनंदात साजरी होणार आहे. हनुमान जयंतीच्या दिवशी हनुमान मंदिर, श्रीराम मंदिर येथे हनुमान जयंतीच्या शुभदिवशी मोठ्या प्रमाणात महाप्रसाद भंडारा, अन्नदान होत असते . कुठे सार्वजनिक तर कुठे वैयक्तिक असतो. मात्र आस्था भक्ती तीच असते.महर्षी वाल्मीकि रामायण महाभारतात दाखविल्याप्रमाणे श्री.प्रभू रामचंद्र यांचे भाऊ लक्ष्मण यांचा जीव वाचवण्यासाठी संकटमोचन हनुमान जी श्री.प्रभूरामचंद यांचे आज्ञाप्रमाणे समोर आले त्यांनी पूर्ण पहाड तळहातावर उचलून आणून त्यामधील संजीवनी बुटी चा उपयोग लक्ष्मणाचा जीव वाचवण्यासाठी केला. असे आपण रामायण मालिकेतून बघितले आहे.एकले आहे.यामागे श्रीप्रभू रामचंद्राचा रामभक्त हनुमानजीवर आशीर्वाद होता. त्यामुळेच लक्ष्मण यांचे प्राण वाचविन्याचे अमूल्य काम हनुमानजी करू शकले. दुवा सोबत दवा ही त्याकाळी कामी आली.म्हणून हनुमानजी यांनी आणलेल्या संजीवनी बुटी चा उपयोग लक्ष्मणाचे जीवन वाचविण्यासाठी झाला. श्रीप्रभूरामचंद्र भक्त हनुमान जयंतीचे सर्व मानव जातीला शुभेच्छा. मानवजातीला संकटातून सोडवावे त्यांच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा या साठी हनुमान चरणी प्रार्थना.

**उमेश ढोणे. मो.९०४९०६७३३१.**

# हळदीचे बेणे अधिक काळ टिकण्यासाठी साठवणूकीत करा हे सोपे उपाय; वाचा सविस्तर

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक**

सध्या हळद पिकाच्या काढणीचा हंगाम सुरू आहे. जे की खांदणी करून काढलेले कंद २ ते ३ दिवस सूर्यप्रकाशात चांगले तापून द्यावेत. कंद तापले की त्यास पाणी सुटते आणि चिकटलेली माती निघून जाते. २ दिवसांनी कंदाची मोडणी करावी.

**हळद बेण्याची साठवणूक करताना घ्यावयाची काळजी**

हळद काढल्यानंतर जे बियाणे पुढील हंगामासाठी वापरायचे आहे ते बियाणे निवडून बाजूला काढावे.

बियाणेची निवड करताना किडग्रस्त, रोगयुक्त अथवा अर्धवट कुजलेले गड्डे साठवणीमध्ये येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

साठवणुकीची जागा सावलीत वारा खेळेल अशा ठिकाणी असावी.

साठवणीकरता निवडलेले बेणे थोड्या उंचवट्यावर कोणाकार ढीग करून रचून ठेवावे.

त्यावर हळदीच्या पानांचा १० ते १५ सेंटीमीटर थर द्यावा. या पाल्यावरती किटकनाशक व बुरशीनाशक फवारणी करावी.

पाला उन्हामध्ये सुकवून त्याचा

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

वापर करावा, पाल्यावर गोणपाट टाकून ते भिजेल एवढे पाणी मारावे.

बेणे साठवणीचा कालावधी ७५ ते ९० दिवसांपर्यंत ठेवाल्यास सर्व बेण्यांचे डोळे फुगलेले दिसतात.

या साठवणीच्या कालावधीमध्ये सुरुवातीस ४५ ते ६० दिवस कोणतीही प्रक्रिया करू नये.

साधारणपणे लागवडीच्या ३० दिवस अगोदर ६ ते ८ दिवसांच्या अंतराने ढिगावरती पाणी मारावे.




या पद्धतीने बियाणे साठवणूक केल्यास गड्ड्यावर असणाऱ्या मूळ्या लवकर कुजतात आणि त्या गड्ड्यापासून त्वरित अलग करता येतात. असे मुळ्याविरहीत गड्डे बेणे लागवडीसाठी उत्तम समजले जाते.

**जमिनीत खड्डा करून बियाणे साठवणे–** ज्या ठिकाणी तापमान ४० अंश सें.च्या वरती जाते अशा ठिकाणी बियाणे खड्डा करून साठवावे.

ज्या ठिकाणी जमिनीतील पाण्याची पातळी एक मीटर पेक्षा खोल आहे व जी जागा उंच ठिकाणी आहे अशा सावलीच्या ठिकाणी १ मीटर खोलीचा व जरुरीप्रमाणे लांबी रुंदीचा खड्डा खोदावा. खड्ड्याच्या तळाला ढाळ/उतार द्यावा.

खड्ड्याच्या तळाशी ३ ते ४ इंच जाडीच्या विटांच्या तुकड्यांचा थर द्यावा, त्यावर बुरशीनाशक आणि कीटकनाशकाची धुरळणी करावी, त्यावर निर्जंतुक केलेल्या पाल्याचा ६ ते ८ इंच इतक्या जाडीचा थर द्यावा.

**खड्ड्याच्या बाजूनेही तेवढ्याच जाडीच्या पाल्याचा थर द्यावा.**

बेण्याचा एक फूट उंचीचा थर झाला की पुन्हा थरावर किटकनाशक, बुरशीनाशक धुरळावे.

खड्डा ३ फूट इतक्या उंचीचा भरून घ्यावा त्यावर निर्जंतुक केलेल्या पाल्याचा थर टाकावा.

खड्ड्यामध्ये एक मीटर अंतरावर छिद्र पाडलेले अडीच ते तीन इंच व्यासाचे पीव्हीसी पाईप टाकावेत.

त्यानंतर खड्डा गोणपाटाने झाकून घ्यावा पाऊस आल्यावर तेवढ्यावेळेपूरता प्लास्टिक कागदाने झाकून घ्यावा.




# पालकांनो...! कडक उन्हाळा, परीक्षेच्या काळात 'अशी' घ्या मुलांची काळजी

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक**

कडक उन्हाळा आणि परीक्षेचा ताण मुलांची दमछाक करणारा असतो, त्यामुळे पालकांनी या काळात मुलांची विशेष काळजी घेणे आवश्यक असते. परीक्षेच्या काळात मुलांचं शारीरिक व मानसिक आरोग्य टिकवणं खूप गरजेचं असतं. यासाठी मुलांना योग्य आहार दिल्यास लक्ष केंद्रित करणं, स्मरणशक्ती आणि ऊर्जा टिकवण्यास मदत होते. पालकांनो कडक उन्हाळ्यात परीक्षेदरम्यान तुमच्या मुलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी अशी घ्या काळजी...



मुलांना स्मरणशक्ती वाढवणारा आहार द्या

सुकामेवा : बदाम, अक्रोड, खजूर – हे मेंदूच्या कार्यासाठी फायदेशीर असतात.

बीजं : जवस, चिया सीड्स यामध्ये ओमेगा–३ असते जे मेंदूसाठी उपयुक्त आहे.

ऊर्जा देणारा सकाळचा नाश्ता द्या ुलांना रोज सकाळी नियमित वेळेत नाश्ता द्या.

नाश्ता काय द्यावा : पोहे, उपमा, अंड्याचं आमलेट, फळं, दूध किंवा ड्रायफ्रूट्स घालतेला शिरा.

दुपारचं जेवण – हलकं आणि पोषक

आहार पचायला हलका पण पोषणमूल्ययुक्त असावा.

घरगुती जेवण द्या : वरण–भात, चपाती, भाजी, कोशिंबीर.

स्नॅक्ससाठी 'हे' आहेत हेल्दी पर्याय

फळांचे तुकडे, मखाणे, पीनट बटर ब्रेड, घरगुती शेंगदाण्याची चिक्की.

भरपूर पाणी व थंड पेये

मुलं अभ्यास करताना पाणी पित नाहीत, त्यामुळे आठवण करून द्या.

लिंबूपाणी, ताक, ओआरएस, नारळपाणी हे उत्तम पर्याय आहेत.

'हे' पदार्थ टाळावेत

भर उन्हामध्ये चिप्स, कोल्ड ड्रिंक्स टाळा.

जास्त साखर व जंक फूड टाळा, त्यामुळे सुस्ती आणि थकवा येतो.

जास्त चहा–कॉफी यामुळे झोप कमी होते पण चिडचिड होते.

# अकोल्यात सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांची सकाळच्या सत्रात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अकोला–** क्रमवारी काही दिवस मोठ्या प्रमाणात तापमानात वाढ होत आहे. शालेय निर्णायक उष्माघाताचा त्रास होऊ नये म्हणून स्वराज्य अधिकाऱ्यांचा बदला बदल आदेश अजगम यांनी केला आहे.४४. से. पर्यंत आहे. तापमानाचा पारा चढता उष्णतेची लाट निर्माण स्थिती आहे. त्यामुळे उष्माघाताचा निर्माण झाला असुन, त्याचा त्रास शालेय होऊ नये, यासाठी हा बदल करण्यात आला आहे.सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांची सकाळच्या सत्रात– प्राथमिक शाळा शिकण्यासाठी ०७ ते ११.१५ व माध्यमिक शाळा ७.०० ते १ असे निश्चित आदेश देण्यात आले आहेत. स्थिर



उष्णतेच्या लाटेपासुन बचाव करण्यासाठी माहिती द्यावी. पेटी मैदानी, शारीकच्या आढळरावात. बाहेरील मैदानाला वर्ग करू नये. वर्ग पंखे सुस्थितीत असल्याने खात्रीशीर. विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ पाणी उपलब्ध. त्यांना मध्यम, सेल, सुती आणि शक्यतो हलक्या रंगाचे ठिकाण परिधान करण्याची मुभा यावी. टोपी किंवा इतर परंपरागत साधनांचा वापर बनवण्यासाठी सुचना द्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

# तीर्थदर्शन योजनेत ८३४ भाविकांना अयोध्या दर्शनाचा लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अकोला–** मुख्यमंत्री तीर्थदर्शन उमेदवार ८३४ भाविकांना अयोध्या दर्शनाचा लाभ देण्यात आला. अयोध्येसाठी हेत्रेकरू अकोला रेल्वेस्थानकापासून आज रवानादें.

सामाजिक न्याय व विशेष सेवा विभाग प्रमुख मंत्री तीर्थदर्शन अपेक्षा अकोला अपेक्षा ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक असलेल्या एकूण ८३४ यात्रेकरूंचा समावेश अयोध्या येथे चार दिवसांकरीता तीर्थदर्शनाचा लाभदायक आहे. तीर्थयात्रेचा रात्री ११ ते १५ एप्रिल निश्चित करण्यात आला आहे. विशेष रेल्वे गाडीने भाविक रवांड. फक्त अनुप धोत्रे, आमदार रणधीर साकर, महिला वसंत खंडेलवाल, समाजकल्याण विभागाच्या वरिष्ठ अधिकारी माया केदार, औपनिवेशक डॉ. अनिता राठोड, विजय अग्रवाल, किशोर पाटील, जयंत मसने, गिरीश जोशी, माधव मानकर, अंबादास उमाळे, ॲड. देवाशिका काकड, पवन महल्ले आदी होते.

भाविकांना रेल्वेस्थानकावर ओळखपत्र वाटप करण्यात आले. प्रवासासाठी आवश्यक, पाणी आणि भोजन वाटप. सर्व प्रदेश प्रदेशात आले. स्वयंसेवक म्हणुन



यात्रेकरुंसमवेत समतादुत व कार्यालयातील कर्मचारी त्यांचे पाठबळ आले आहे.

नागरिकांच्या सोयी–सुविधा राज्य शासनाच्या अनेक योजना पालकमंत्री ड. आकाशात मार्गदर्शन फुंडकर होत आहे.तीर्थ प्रदर्शनात भारतातील आणि महाराष्ट्र महत्वाच्या तीर्थक्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे. समानार्थयात्रांना स्थानिक मन: तसेच आध्यात्मिक सुविधांमुळे सुखकर व्हावे क्षेत्र, यासाठी सर्व धर्मीय स्थानिक तीर्थक्षेत्र भारतातील तीर्थची पंतप्रधान तीर्थ दर्शनासाठी मोठ्या संख्येने सहभागी आहेत. अर्जदारांच्या पहिल्या यादीतील भाविक आज अयोध्येला रवाना, असे डॉ. राठोड यांनी सांगितले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucngmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १२ एप्रिल २०२५ शहर/ग्रामिण


## अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत
# जिल्ह्यातील ३ रेल्वे स्थानकांचा कायापालट

### – रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती –** भारतीय रेल्वेच्या 'अमृत भारत स्टेशन' योजनेंतर्गत राज्यातील एकूण १३२ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. यात जिल्ह्यातील तीन रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. त्यासोबतच बडनेरा रेल्वे स्थानकाला ३६.३ कोटी आणि धामणगाव रेल्वे स्टेशनला १८ कोटी रुपयांचा निधी दर्जेदार सुविधा उपलब्ध करण्यासाठी देण्यात येणार आहे.या योजनेद्वारे देशभरातील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे.



प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेवेळी ही माहिती देण्यात आली. महाराष्ट्रातील रेल्वेच्या दर्जेदार पायाभूत सुविधेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री श्री. वैष्णव यांचे आभार मानले.

या योजनेत समाविष्ट काही महत्त्वाची स्थानके म्हणजे अमरावती आणि ग्रामीण भागातील स्थानकांमध्ये बडनेरा आणि धामणगाव रेल्वे यांना स्थान देण्यात आले आहे.या योजनेमुळे स्थानकांवर प्रवाशांसाठी वेटिंग लाऊंज, फूड कोर्ट्स, स्वच्छतागृहे, लिफ्ट्स, एस्कलेटर्स आणि डिजिटल सुविधांसारख्या आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत. तसेच, स्थानकांचे सौंदर्यीकरण आणि शहराशी अधिक सुसंगत दळणवळण व्यवस्था विकसित केली जाणार आहे.या पुनर्विकासात स्थानकांची नावे आणि त्यासाठीचा निधी पुढीलप्रमाणे आहे. बडनेरा (३६.३ कोटी), धामणगाव स्टेशन (१८ कोटी) निधी देण्यात येणार आहे--

# रविवारी जय भीम पदयात्रेचे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती,–** केंद्रीय श्रम व रोजगार, युवक कल्याण व क्रीडा मंत्रालयाच्या निर्देशानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त रविवार, दि. १३ एप्रिल रोजी जय भीम पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. पदयात्रेची सुरुवात सकाळी ७ वाजता विभागीय क्रीडा संकुल, नेहरू स्टेडियम येथून होईल. पदयात्रा स्टेडियम, शिवाजी बहुउद्देशीय शाळा, वीर माता दुर्गावती चौक, गर्ल्स हायस्कूल चौक, दयासागर हॉस्पिटल, इर्वीन चौक मार्गे निघणार आहे. इर्विन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून पदयात्रेचा विभागीय क्रीडा संकुलात समारोप करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासन, शैक्षणिक संस्था, मंडळे, एनसीसी, एनएसएस, नेहरू युवा केंद्र, महानगरपालिका, भारत स्काउट गाइड आणि शासकीय यंत्रणा, आरोग्य विभाग, शिक्षणाधिकारी, उच्च शिक्षण विभाग, पोलिस विभाग यांच्या पदयात्रेत सहभाग राहणार आहे. या पदयात्रेत नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले आहे.

### अखेर प्रादेशिक परिवहन कार्यालयाला आली जाग.......

# राख वाहून नेणाऱ्या वाहनांवर आरटीओची कार्यवाही

## अकरा वाहनांना आकारला २ लाख २५ हजार दंड



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२ अमरावती** रतन इंडिया औष्णिक उर्जा वीज प्रकल्पातून राखेची वाहतूक करणारे वाहनाची आरटीओ विभागाकडून संपूर्ण जिल्ह्यात तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या ११ वाहनांना २ लाख २५ हजाराचा दंड प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून आकारण्यात आला.

गेल्या दोन दिवसापासून विशेष तपासणी मोहीम अंतर्गत रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पातून निघणाऱ्या प्रत्येक वाहनाची तपासणी करण्यात आली. यामध्ये राखेची वाहतूक करणारे अकरा वाहनावर मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमान्वये कार्यवाही करण्यात येऊन त्यांच्याकडून दोन लाख पंचवीस हजार रुपये दंड आकारण्यात आला.

प्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीमती उर्मिला पवार, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी सिद्धार्थ ठोके यांच्या मार्गदर्शनात मोटार वाहन निरीक्षक निलेश दहेकर , पल्लवी दौंड , सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक ऋषिकेश गावंडे , शिवशंकर कातडे, कांचन जाधव, निलेश जाधव, वाहन चालक मोहम्मद अतहर , बलराज बोंडवले , अमित पाल व पंकज कोवे यांनी ही कार्यवाही केली.

मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करून राखेची वाहतूक करणाऱ्या वाहनावर आतापर्यंत ऑक्टोंबर २०२४ ते आज पर्यंत ५४ वाहनांवर कार्यवाही करण्यात येऊन त्यांच्याकडून १९ लाख ९० हजार पाचशे रुपयाचा दंड आकारण्यात आला आहे.–

# टोलनाक्याविरुद्ध भाजपाचा ठिय्या

## हैदतपूर, वडाळा येथे टोलनाका



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२चांदूर बाजार–** चांदूर बाजार ते परतवाडा राष्ट्रीय महामार्ग ३५३ वरील हैदतापूर वडाळा येथे उभारण्यात येत असलेल्या टोल नाक्याविरुद्ध भाजपा ओबीसी जिल्हा सचिव नीलेश देशमुख यांनी आक्रमक भूमिका घेत टोलनाक्याविरुद्ध बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केलेले आहे. राष्ट्रीय महामार्गावर ज्या ठिकाणी टोल नाका उभारण्यात येत आहे, त्या परिसरात अनेक गावे वसलेली असून प्रत्येक छोट्या मोठ्या कामाकरिता चांदुर बाजार येथे तालुक्याच्या ठिकाणी यावे लागत.तसेच शेती करण्याकरिता टोल नाक्यावरून शेती वाहनांची वाहतूक करावी लागणार आहे. त्यामुळे भविष्यात टोल नाक्यावरून पुढे संघर्ष उडणार आहे. त्यामुळे टोलनाका उभा होण्या अगोदरच रद्द करावा, याकरिता हैदतपूर वडाळा येथे होणारा टोलनाका बंद करण्याबात ठिय्या आंदोलन नीलेश देशमुख यांनी सुरू केले आहे. ठिय्या आंदोलनाचा मंगळवारचा दुसरा दिवस असून वृत्त लिहेपर्यत प्रशासनाने अधिकारी व आंदोलकांची चर्चा झाली नाही.

# अमरावती महानगरपालिकेमध्ये ई-ऑफीस प्रणाली सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती–** प्रशासकीय कामकाज गतिमान होण्यासाठी अमरावती महानगरपालिकेने ई-प्रणाली ऑफिस सुरू केले आहे.



सदर प्रणाली महानगरपालिकेत कार्यान्वित करावयाची असल्याने त्याबाबतचे प्रशिक्षण दिनांक २७ मार्च,२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे आयोजित करण्यात आले होते. महानगरपालिका क्षेत्रात ई-ऑफिस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांच्या सूचनांनुसार, मनपा स्तरावरील कार्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ई-ऑफिस प्रणालीचे प्रशिक्षण देण्यात आले होते. यावेळी आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे म्हणाले की, प्रशासकीय कामकाज गतिमानतेने व्हावे, या उद्देशाने प्रशासनाने ई-ऑफिस प्रणाली सुरू केली आहे. या प्रणालीमुळे झटपट कामे मार्गी लागतील, नागरिकांच्या तक्रारी त्वरित संबंधित अधिकाऱ्या पर्यंत पोहोचतील, असे आयुक्त सचिन कलंत्रे यांनी सांगितले, तसेच विकासकामांच्या फाईल्स आता हाताळल्या जाणार नसून थेट ई-प्रणालीच्या माध्यमातून संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहचणार असल्याचे यावेळी आयुक्तांनी स्पष्ट केले. सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे यांची ई-ऑफीस प्रणाली करीता नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. अमरावती महानगरपालिकेमध्ये ई-ऑफीस प्रणाली कार्यान्वित करण्याकरीता संगणक विभाग पुढाकार घेत आहे. तसेच सर्व अधिकारी व कर्मचा-यांचे ई-ऑफीस प्रणाली करीता डेसळप खऊ तयार करण्यात आले आहे. तसेच सर्व अधिका-यांचे ऊडउ (ऊळसळींरश्र डळसपर- ीीश उर्शीींळषळलरींश) तयार केले आहे. संगणक विभागामार्फत सर्व विभागप्रमुख व कर्मचा-यांना ई-ऑफीस प्रणाली संदर्भात प्रशिक्षण देण्यात येत आहे. अमरावती महानगरपालिकेतील सर्व विभागामार्फत ई-ऑफीस प्रणाली चा वापर सुरु करण्यात आला आहे. याबाबत अमरावती महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांनी समाधान व्यक्त केले असुन अमित डेंगरे सिस्टीम मॅनेजर व त्यांच्या चमुचे कौतुक केले आहे.

विदर्भ प्रजासत्ताक

# आईच्या डोळ्यादेखत चिमुकल्याचा बसखाली चिरडून मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती :** अमरावती ते बडनेरा मार्गावर जुन्या वस्तीतील सजनाजीबुवा हनुमान मंदिरापासून थोड्या अंतरावर एसटी महामंडळाच्या बसने दुचाकीला जबर धडक दिल्याने सात वर्षाच्या चिमुकल्याचा मागील चाकात येऊन जागीच मृत्यू झाला, तर आई जखमी झाली. हा अपघात शुक्रवारी दुपारी घडला. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रुद्र मंगेश घीडाणी (७, रा. न्यू प्रभात कॉलनी, नवीवस्ती, बडनेरा) असे मृत चिमुकल्याचे नाव आहे. तो अमरावती ते बडनेरा मार्गावरील एका शाळेत पहिल्या वर्गामध्ये शिकत होता. नेहमीप्रमाणे त्याच्या आईने त्याला शाळेत सोडून देण्यासाठी दुचाकीवर घेतले. मार्गातील सजनाजी बुवा हनुमान मंदिराजवळ अचानकपणे एमएच १४ एलएक्स ८८६३ क्रमांकाच्या बसने दुचाकीला जबर धडक दिली.




दुचाकीवर मागे बसलेला रुद्र हा बसच्या मागील चाकाखाली आला, तर त्याची आई विरुद्ध दिशेने फेकली गेली. अपघात घडल्याचे निदर्शनास येताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जबर जखमी झालेल्या रुद्रला नागरिकांनी अमरावतीला उपचारासाठी घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, तेवढ्यात त्याचा मृत्यू झाला. चिमुकल्याच्या मृत्यूमुळे बडनेरा नवी वस्ती परिसरात शोकमय वातावरण आहे. आईच्या डोळ्यादेखत चिमुकल्याचा मृत्यू झाला. अपघातस्थळी मोठी गर्दी उसळली होती. पोलिसांनी तत्काळ पोहचून परिस्थिती सांभाळली. अपघातास कारणीभूत ठरलेली बस ही अकोला-चंद्रपूर फेरी करीत होती. चालक दिगंबर मंगल कनाके (४१, रा. शेखबराज, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर) याला बडनेरा पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. रुद्रच्या अपघाती मृत्यूनंतर शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# एचव्हीपीएम'चे क्रीडा विद्यापीठ लवकरच सुरू- क्रीडामंत्री भरणे

## स्वायत्त डीसीपीई महाविद्यालयातील ३९ प्रतिभावंतांचा केला गौरव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती–** जगविख्यात श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाबद्दल खुप ऐकलं होतं, आज या दिक्षांत समारंभाच्या माध्यमातून मंडळाची प्रत्यक्ष भेट, पाहणी आणि मंडळाच्या कार्याची माहिती झाली. स्वातंत्र्य काळापासून तर आजपर्यंत एखादी संस्था देशाच्या वाटचालीमध्ये समर्पित योगदान देत आहे हे खरोखर प्रेरणादायी व गौरवशाली आहे. मैदानी खेळ, कला-संस्कृती ते आधुनिक शिक्षणाचा प्रवास करतांना हजारो, लाखो विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व घडवत राष्ट्र उभारणीला बळ देणाऱ्या श्री हव्याप्र मंडळाला थेट क्रीडा विद्यापीठाचा दर्जा श्री हव्याप्र मंडळाच्या कार्याची फलश्रुती आणि अमरावतीचा गौरव आहे. या संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी येथील वैभवशाली संस्कार आत्मसात करत एक उत्तुंग व्यक्तीमत्व साकार करत देश, समाज कार्यासाठी पुढाकार घ्यावा. त्यासाठी राज्याच्या क्रीडामंत्री म्हणून मंडळाला मिळालेला क्रीडा विद्यापीठाचा दर्जा पाहता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून शासन स्तरावरील अडचणी दूर करत श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे क्रीडा विद्यापीठ लवकरात लवकर सुरू होणार असल्याची ग्वाही राज्य क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी शुक्रवारी दिली.श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे स्वायत्त डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन महाविद्यालयाचा ११ दिक्षांत समारंभ मंडळाच्या अनंत क्रीडा



मंदीर सभागृह येथे सकाळी ११ वा. आयोजित करण्यात आला होता. या समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून क्रीडामंत्री भरणे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मंडळाचे प्रधान सचिव प्रभाकरराव वैद्य यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष, मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष ड. प्रशांत देशपांडे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, उच्च तंत्र शिक्षण विभागाचे डॉ. सुबोध भांडारकर, मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, मंडळाच्या सचिव व उपप्राचार्य डॉ. माधुरी चेंडके, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, सचिव डॉ. विकास एम. कोळेश्वर, डॉ. आराधना वैद्य, परीक्षा नियंत्रक डॉ. विजय पांडे, डिग्री



कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन महाविद्यालयाच्या सर्व शाखेचे विभागप्रमुख उपस्थित होते. सर्व शाखेतील एकुण ३९ प्रतिभावंत विद्यार्थ्यांना १३ सुवर्ण, १३ रौप्य, १३ कांस्य पदक, प्रमाणपत्र देत त्यांना गौरव केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष व मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष ड. प्रशांत देशपांडे म्हणाले, क्रीडामंत्र्यांची श्री हव्याप्र मंडळाला झालेली भेट अविस्मरणीय ठरणार आहे. कारण, १९८४ नंतर राज्याचे क्रीडामंत्री यांनी मंडळाला भेट दिली.

# पैशांचं झाड! शेतकरी एका रात्रीत झाला करोडपती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ यवतमाळ :** यवतमाळ जिल्ह्याच्या एका शेतकऱ्याला झाडाने करोडपती केल्याचे समोर आले आहे. वडिलोपार्जित असलेल्या शेतामध्ये असलेल्या शंभर वर्ष जुन्या झाडामुळे हे सर्व घडून आले आहे. रेल्वे प्रशासनाकडून मार्ग पाहणीसाठी करण्यात आलेल्या सर्व्हेमध्ये या झाडाचे मूल्य समजले आणि कोर्टाच्या निर्णयानंतर शेतकरी कुटुंबाला एक कोटी रुपये मिळणार आहेत. यातील निम्मे रक्कम शेतकरी परिवाराला मिळाली आहे.



यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील खुर्शी येथील केशव शिंदे या शेतकऱ्याकडे ७ एकर वडिलोपार्जित शेती आहे. शेतकरी केशव शिंदे आणि पंजाब शिंदे यांच्या शेतातून वर्धा- यवतमाळ, पुसद- नांदेड रेल्वे मार्ग जातो. या शेतात एक जुने झाड आहे. मात्र हे झाड नेमके कशाचे आहे? हे शिंदे परिवाराला माहीतच नव्हते. मात्र २०१३-१४ मध्ये रेल्वेचा एक सर्वे झाला. त्यावेळी कर्नाटकातील काही लोक रेल्वे मार्ग पाहण्यासाठी आले असता त्यांनी हे झाड रक्तचंदनाचे असून त्याचे मूल्य शेतकऱ्याला समजावून सांगितले.

### रक्तचंदन झाडाचे पाच कोटी इतके मूल्य

दरम्यान रेल्वे मार्ग उभारणीसाठी रेल्वे प्रशासनाने भूसंपादन केले. मात्र या झाडाचे मूल्य देण्यास रेल्वेकडून टाळाटाळ करण्यात येत होती. त्यामुळे या परिवाराने झाडाचे खाजगी मधून मूल्यांकन काढले असता त्याचे मूल्य चार कोटी ९७ लाख रुपये इतके होते. मात्र रेल्वेने ते देण्यास टाळाटाळ केल्याने शिंदे परिवाराने नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली. न्यायालयाने एका वर्षात निकाल दिला आहे. न्यायालयाने या झाडाच्या मूल्यांकनाच्या मोबदल्यात रेल्वे विभागाकडून एक कोटी रुपये देण्याचे आदेश देत रेल्वे विभागाकडून एक कोटी रुपये जमा करून घेतले. मात्र याचिकाकर्त्यांचे वकील राऊत यांनी मूल्यांकननंतर रक्त चंदनाच्या झाडाच्या मोबदल्याची किंमत पाच कोटी रुपये पर्यंत होऊ शकते असा दावा केला आहे.

# पांढरी येथे भीषण आगीत चार दुकाने खाक

## शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२पांढरी-** भातकुली तालुक्यातील पांढरी येथे चार दुकाने भीषण आगीत जळून खाक झाली. यामध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. अंजनगाव सुर्जी ते परतवाडा मार्गावरील पांढरी येथील स्टँडवरील गुरुवारी दुपारी ३ वाजता काही दुकानांना अचानक आग लागली.



या आगीत अमोल हाडोळे यांचे श्री माऊली कृषी सेवा केंद्र, गजानन निंबोकार तसेच सुधाकर निंबोकार या दोघांचे सलूनची दुकाने व सुनील अतकरे यांचे पानटपरीसह चहा कॅन्टीन जळून खाक झाले आहे. माऊली कृषी सेवा केंद्राचे संचालक अमोल हाडोळे यांनी ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला आहे. या आगीमुळे रासायनिक खते, बियाणे व इतर साहित्य व त्याचप्रमाणे सलूनच्या दुकानातील साहित्य, चहाच्या दुकानातील साहित्य जळून खाक झाल्याचे नागरिकांनी सांगितले. दुकानांना आग लागल्याचे दिसून येताच ती विझविण्यासाठी नागरिकांची धावपळ सुरू झाली होती. घटनेची माहिती अंजनगावचे तहसीलदार पुष्पा सोळंके यांना मिळताच तत्काळ अग्निशामक गाडी पांढरी येथे पाठवण्यात आल्याने आग तातडीने आटोक्यात आणण्यात आली. या दुकानांमध्ये सिलिंडरही होते. परंतु, सिलिंडरला आग लागली नाही. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# ई-आर-१ विवरणपत्र ऑनलाइन सादर करा

## अमरावती जिल्हा कौशल्य विकास कार्यालयाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती-** खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापनांनी त्रैमासिक विवरणपत्र ई-आर-१ ऑनलाइन पद्धतीने सादर करावे, असे आवाहन अमरावती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता कार्यालयाने केले आहे.अमरावती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयामार्फत देण्यात येणाऱ्या योजना विषयक सर्व सेवा आता ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यासाठी ïरहरींूरा.ऱ्सीं.ळप हे संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. तसेच उद्योग आणि आस्थापना यांनी सेवायोजन कार्यालय (रिक्त पदे अधिसूचित करण्याची सक्ती करणे) कायद्यान्वये त्रैमासिक ई-आर-१ ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे.मार्च २०२५ अखेर संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीकरिता ई-आर-१ ची प्रणाली माहिती वरील संकेतस्थळावर सर्व शासकीय,निमशासकीय,खाजगी उद्योजक,आस्थापना यांनी त्यांचे युजर आयडी व पासवर्डच्या माध्यमातून लॉगिन करून ऑनलाइन सादर करण्याची आहे. तसेच, त्याबाबतचे प्रमाणपत्र संकेतस्थळावरून प्राप्त करून घ्यावयाचे आहे.ऑनलाइन ई-आर-१ सादर करताना काही अडचण आल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती या कार्यालयाशी संपर्क साधावा. यासाठी कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६ उपलब्ध आहे. ई-आर-१ सादर करण्याची अंतिम मुदत एप्रिल २०२५ आहे. या मुदतीत ई-आर-१ ऑनलाइन सादर न करणाऱ्या आस्थापनांवर विहित नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत कळविण्यात आले आहे.

# मासोदमध्ये आरोग्य स्थिती नियंत्रणात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती,-** जिल्ह्यातील मासोद येथे दि ७ एप्रिल रोजी दूषित पाण्यामुळे रोगाची लागण झाल्याने प्राथमिक आरोग्य केंद्राची चमू तातडीने घटनास्थळी दाखल झाली. बाधितांच्या घराशेजारील आणि मुख्य पाण्याच्या स्रोताचे जैविक नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले आहे. यामुळे मासोदमधील आरोग्य स्थिती नियंत्रणात आली आहे. मासोद गावातील एकूण २०२ घरे आणि ९२५ लोकांचे सर्वेक्षण करण्यात आले. बाधितांवर चांदूरबाजार येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यातील १० रुग्णांपैकी ६ जणांना उलट्या आणि जुलाब, तर ४ जणांना कोणतेही लक्षण नसताना दाखल करण्यात आले. रूग्णांनी दि. ७ एप्रिलच्या संध्याकाळी रुग्णांनी डॉक्टरांच्या सल्ल्याविरुद्ध घरी जाण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर गावात ८ एप्रिलपर्यंत उलट्या किंवा जुलाबाचा एकही नवीन रुग्ण आढळलेला नाही. प्रशासनाने विलगीकरण कक्ष स्थापन करून आवश्यक औषधसाठा उपलब्ध केला आहे. गावात नियमित सर्वेक्षण सुरू असून वैद्यकीय कर्मचारी सतत कार्यरत आहेत. बहुउद्देशीय पुरुष कर्मचाऱ्यांमार्फत वितरित होणाऱ्या टँकरमधील पाण्याची तपासणी केली जात असून पाणी पिण्यासाठी सुरक्षित असल्याची खात्री झाल्यावरच जलसाठा उपलब्ध केला जात आहे. बाधित व्यक्तींच्या घरी आरोग्य कर्मचारी नियमित भेट देत असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. गावात दवंडीच्या माध्यमातून प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि जनजागृती केली जात आहे. सध्या गावाची परिस्थिती नियंत्रणात असून एकही रुग्ण नाही, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले यांनी कळविले आहे.

# उष्मघाताने घेतला विद्यार्थ्याचा बळी

## उन्हाचा त्रास झाला, रुग्णालयात नेताना वाटेतच जीव सोडला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२बुलढाणा** राज्यात तापमानात झपाट्याने वाढ होत असून, बुलढाणा जिल्ह्यातही उन्हाच्या तीव्र झळा जाणवू लागल्या आहेत. या वाढत्या उष्णतेचा गंभीर परिणाम आता शाळकरी मुलांवर होऊ लागला आहे. इयत्ता सहावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे. विद्यार्थी शाळेमधून घरी येत होता. अचानक त्याची तब्येत बिघडली. प्राथमिक उपचार करून त्याला अकोला नेण्यात येत होते, मात्र रस्त्यावरच त्याची प्राणज्योत मालवली. या दुर्दैवी घटनेनंतर परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.



### शाळकरी मुलांवर उष्णतेचा गंभीर परिणाम

बुलढाणा जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. या उष्णतेमुळे रोगराई वाढत आहे. या उष्माघाताचा शाळकरी विद्यार्थ्यांवर थेट परिणाम होऊ लागला आहे. या उष्माघाताचा बुलढाण्यात पहिला बळी गेला असून, परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. यामुळे शाळा प्रशासनाने तसेच पालकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे.

संस्कार सोनटक्के असे विद्यार्थ्याचे नाव आहे. हा चिमुकला शेगाव येथील संत गजानन महाराज ज्ञानपीठ विद्यालयात इयत्ता सहावीत शिकत होता. बऱ्याच दिवसांपासून उष्मघाताच्या त्रासामुळे त्याला अस्वस्थ वाटू लागले होते. संस्कार शाळेतून घरी परतला होता. घरी परतल्यानंतर त्याची अचानक तब्येत बिघडली.प्राथमिक उपचार करून त्याला पुढील उपचारासाठी अकोला येथे नेत असतानाच, रस्त्यातच त्याची प्राणज्योत मालवली. या दुर्दैवी मृत्यूनंतर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# अमरावती जिल्हा क्रीडा संकुलाला निधीची कमतरता भासू देणार नाही-क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती,** राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज अमरावती जिल्हा क्रीडा संकुलाला सदिच्छा भेट दिली.

या भेटीदरम्यान त्यांनी संकुलातील विविध क्रीडा सुविधांची पाहणी करून खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, असे आश्वासन दिले. श्री. भरणे यांनी संकुलातील खेलो इंडिया आर्चरी सेंटर, आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्क्वॅश कोर्ट, ज्युदो, कुस्ती, कबड्डी, बॅडमिंटन बहुउद्देशीय हॉल, जिम, कार्यालय आणि बांधकाम प्रगतीपथावर असलेल्या क्रीडा वसतिगृहाच्या कामाची पाहणी केली.यावेळी मंत्री श्री.भरणे यांनी संकुलातील सुविधांवर समाधान व्यक्त केले.

अमरावती जिल्हा क्रीडा संकुलात आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा आयोजित करता येतील, अशा प्रकारच्या विविध क्रीडा सुविधा खेळाडूंना उपलब्ध करून दिल्या जातील. या संकुलातून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तराचे खेळाडू घडतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. अमरावती विभागाचे उपसंचालक शेखर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, तालुका क्रीडा



अधिकारी आर. व्ही. वडते, क्रीडा कार्यकारी अधिकारी ममता कोळमकर आदि उपस्थित होते.हव्याप्र महाविद्यालयाच्या दीक्षांत समारोह कार्यक्रमाला उपस्थिती श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळामार्फत चालविले जाणारे डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन बहुसंकाय स्वायत्त महाविद्यालयाचा ११ व्या दीक्षांत समारोह कार्यक्रमाला क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे उपस्थित होते. अनंत क्रीडा जिम्नॅस्टिक सभागृहात आयोजित कार्यक्रमात संस्थेचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकर वैद्य, संस्थेचे अध्यक्ष प्रशांत देशपांडे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, प्राचार्य श्रीनिवास देशपांडे आदी उपस्थित होते. श्री. भरणे यांनी विदयार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. क्रीडा क्षेत्रात श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे कार्य तळमळीने आणि अव्याहतपणे सुरू आहे. हव्याप्रला क्रीडा क्षेत्रासाठी आवश्यक सर्वतोपरी मदत शासनामार्फत करण्यात येईल असा विश्वास व्यक्त केला. पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांनी यावेळी संस्थेची कारकीर्द सांगितली. श्री. असनारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रशांत देशपांडे यांनी संस्थेची माहिती दिली.

## आमदार रवी राणा आणि नवनीत राणा यांच्या संकल्पनेनुसार बांधकाम अंतिम टप्प्यात

# हनुमान गढी येथे राज्यातील सर्वात ऊंच १११ फूट पूर्णाकृती पुतळा झाला साकार

### शहराशेजारी निसर्गाच्या कुशीत एक सुंदर पर्यटन क्षेत्र उपलब्ध होणार, भाविकांसाठी अन्नछत्र बांधले जाणार५०० भाविकांसाठी भक्त निवासची देखील होणार व्यवस्था

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती.** १६आमदार रवी राणा आणि मा. खासदार नवनीत राणा यांना तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हनुमान चालीसा पठण केल्याबद्दल मुंबई तुरुंगात टाकले होते. या तुरुंगात कैदेत असताना आमदार रवी राणा आणि नवनीत राणा यांनी संकल्प केला की ते शहराजवळ अयोध्येच्या धर्तीवर हनुमान गढी साकार करुन तेथे संकटमोचन हनुमानजींची १११ फूट उंच मूर्ती स्थापित करतील आणि दररोज सकाळी आणि संध्याकाळी हनुमान चालीसा पठण करण्याची व्यवस्था करतील. भाविकांना बजरंगबलीच्या श्रद्धेत डुबकी मारायला लावेल. या प्रकारे आपल्या संकल्पप्रमाणे राणा दांपत्यांनी न भूतो न भविष्यती असे २०० कोटी रुपये खर्चाचे हे बांधकाम आता अंतिम टप्प्यात आले आहे. आज हनुमान जयंतीनिमित्त हनुमान गढ़ी येथे दिवसभर हनुमान चालीसा आणि विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.यावेळी येथे येणाऱ्या भक्तांकरिता महाप्रसाद देखील वितरीत केल्या गेला.'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' या अभंगाप्रमाणे आमदार रवी राणा आणि नवनीत राणा यांचा समाजकारणातच १०० टक्के विश्वास आहे. आमदार रवी राणा यांनी सर्वप्रथम छत्री तलाव रस्त्यावर अमरावती शहरापासून फक्त २ ते ३ किमी अंतरावर



पूर्णपणे नैसर्गिक वातावरणात हनुमान गढी स्थापन करण्यासाठी श्री हनुमान चालीसा ट्रस्टची स्थापना केली. या ट्रस्टला त्यांची ५० एकर जमीन दान केली. जेणेकरून हनुमान गढी त्याच्या भव्य आणि दिव्य स्वरूपात साकार करण्याचे संकल्प पूर्ण होईल. १११ फूट ऊंच पुतळ्याचे बांधकाम गेल्या २ वर्षांपासून सतत सुरू आहे. जे आता अंतिम टप्प्यात आहे. एक प्रचंड ऊंच पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला आहे. जे १ किलोमीटर अंतरावरून देखील पाहता येते. आता पुतळ्याचे पाऊस आणि उन्हापासून संरक्षण करण्यासाठी फक्त लेप लावण्याचे कार्य उरले आहे. राजस्थानचे शिल्पकार ताराचंद शर्मा यांच्या नेतृत्वाखाली दररोज १५ कामगार काम करत आहेत. या पुतळ्याच्या जागेजवळील ३० एकरच्या संकुलात राम वाटिका तयार केली जात आहे. या ठिकाणी भगवान श्रीराम यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या घटनांवर आधारित स्थळ बांधली जात आहेत. जसे की शबरीचे ठिकाण आणि बोराचे झाड, राम सेतू, ४ ते ५ मचान, मनोरंजन साहित्य सुसज्ज केले जाणार आहे. ज्यामुळे हनुमान गढी हे श्रद्धा आणि भक्तीचे ठिकाण तसेच सर्वात मोठे पर्यटन क्षेत्र ठरेल. आणखी एक विशेष गोष्ट म्हणजे हनुमान गढीचे भूमिपूजन देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री असताना आणि एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना केले होते. आता आमदार रवी राणा यांनी माहिती दिली की, केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या हस्ते १११ फूट ऊंच हनुमान पुतळ्याचे उद्घाटन करण्याची तयारी सुरू आहे. ते म्हणाले की, १११ फूट ऊंचीच्या पुतळ्याजवळ एक मोठे सभागृह बांधले जात आहे. ५०० भाविकांसाठी भक्त निवास देखील तयार केला जात आहे. दररोज सकाळी ५ वाजता आणि सायंकाळी ५ वाजता हनुमान चालीसा नियमितपणे पठण केले जात आहे. तसेच अखंड रामायण कार्यक्रम सुरू झाला आहे.

# शासनाची आर्थिक फसवणूक प्रकरणी वादग्रस्त डीआरटीओ बागरीला अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

शासनाची आर्थिक फसवणूक व गुन्हेगारी स्वरूपाचा कट रचल्याप्रकरणी अखेर चौकशीच्या २४ व्या दिवशी 'फ्रॉड' डीआरटीओ राज बागरी याला १० एप्रिल रोजी अटक करण्यात आली. दरम्यान, न्यायालयाने त्याचा जामीन नाकारल्याने शुक्रवारी त्याची येथील जिल्हा मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा आमदार विजय वडेट्टीवार यांनी विधिमंडळ अधिवेशनादरम्यान बागरीच्या न झालेल्या अटकेचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यामुळे गाडगेनगर पोलिसांनी लागलीच त्याला १८ मार्च रोजी नागपुरातून ताब्यात घेतले होते. मात्र अनेकदा चौकशीस बोलावल्यानंतर त्याला अटक केली नव्हती. अखेर त्याला गुरुवारी अटक करण्यात आली.

आरोपी राज बागरी याच्या सहा ते सात वेळा केलेल्या चौकशीदरम्यान व त्याच्या जबाबातून पोलिसांना ठोस असे काही निष्पन्न न झाल्याने अखेर त्याला अटक करण्यात आल्याची माहिती गाडगेनगरचे ठाणेदार ब्रह्म गिरी यांनी दिली. अटकेनंतर लगेचच त्याला न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलिस कोठडीही सुनावली. मात्र, शुक्रवारी न्यायालयाने त्याचा जामीन नाकारून त्याची रवानगी कारागृहात केल्याचेही गिरी म्हणाले.

या प्रकरणाचे तपास अधिकारी पोलिस निरीक्षक समाधान वाठोरे यांनी वारंवार त्याचे जबाब नोंदविले होते. मात्र ताब्यात घेतल्याच्या तब्बल २४व्या दिवशी ते राज बागरीच्या अटकेच्या निष्कर्षाप्रत पोहोचले. तपासाच्या संथगतीबाबत पोलिस उपायुक्त समाधान वाठोरे यांना कारणे दाखवा नोटीसही बजावली होती. तर, १८ मार्च रोजी ताब्यात घेतल्यानंतर त्याला अटक का केली नाही, अशा शब्दांत सीपींनीही संबंधित अधिकाऱ्यांची कानटोचणी केली होती.



आरोपी राज बागरी याला गुरुवारी अटक केली. न्यायालयाने त्याचा जामीन नाकारला. त्याला न्यायालयीन कोठडीअन्वये जिल्हा मध्यवर्ती कारागृहात धाडण्यात आले. तपास योग्य दिशेने सुरू आहे.

**– ब्रम्ह गिरी, ठाणेदार, गाडगेनगर**

# इतिहास हा विसरण्यासारखा नसतो - न्या.सुधाकर यार्लगड्डा

## डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

समाजामध्ये विधिज्ञांच स्थान महत्त्वाचे आहे.आज राजकारण वेगळ्या दिशेने जात असतानाच इतिहासातून सर्वांनी माहिती घेत आपलं समाजातील स्थान उज्वल करावं. इतिहास हा शिक्षणासाठी असतो तो विसरण्यासाठी नाही, असं मार्गदर्शनपर उद्गार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री सुधाकर यार्लगड्डा यांनी काढले.डॉ.पंजाबराव देशमुख विधि महाविद्यालय येथे आयोजित पदवी वितरण समारंभाला मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले होते. यावेळी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.अविनाश असनारे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ.पंजाबराव देशमुख विधि महाविद्यालयाच्या पदवी वितरण समारंभात एकूण




३०० विद्यार्थ्यांना पदवीचे वितरण करण्यात आले. कायद्याचे शिक्षण हे सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी कसे फलदायी ठरेल यासाठी कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन कुलसचिव डॉ.अविनाश असनारे यांनी यावेळी आपल्या मार्गदर्शनातून केले. यावेळी विद्यापीठ व महाविद्यालयातून गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार मुख्य अतिथींच्या हस्ते झाला.यासोबतच सेट परीक्षा उत्तीर्ण झालेले आणि आचार्य पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा देखील मान्यवरांनी सत्कार केला. एलएलबी तीन वर्षीय अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यामध्ये संकेत बागडे याला सुवर्णपदक तसेच स्व.अप्पासाहेब वानखडे स्मृती मेरिट शिष्यवृत्ती आणि प्राचार्य स्व.एन.सी.देशमुख मेरिट शिष्यवृत्ती देऊन गौरविण्यात आले. द्वितीय पारितोषिक निष्ठा शादानी हिला रौप्य पदक देऊन गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे प्रवीण रोडगे आणि राजेश कराळे यांना कांस्यपदक देऊन गौरविण्यात आले. एल एल बी पाच वर्षीय अभ्यासक्रमातून गुणवत्ता यादीत आलेल्या मध्ये शरयू बिडवई हिला सुवर्णपदक आणि कै. जे. डी.पाटील सांगळूदकर स्मृती मेरिट शिष्यवृत्ती,शालिनी भुयार या विद्यार्थिनीला रौप्य पदक प्रदान करण्यात आले. तसेच अभय भेंडेकर आणि आसावरी खोत यांना कास्यपदक देऊन गौरविण्यात आले. एलएलएम दोन वर्षीय अभ्यासक्रमामध्ये विद्यापीठातून प्रथम आलेला प्रतीक सगने याला सुवर्णपदकासह प्राचार्य एन.सी देशमुख स्मृती मेरिट शिष्यवृत्ती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत द्वितीय आलेला मनोज नरवाडे याला रौप्य पदकासह प्राचार्य एन.सी.देशमुख स्मृति मेरिट शिष्यवृत्ती देऊन गौरविण्यात आले. शिवानी खापरे हिला कांस्यपदक देऊन सन्मानित केले. यासोबतच हिंदू लॉ या विषयात सर्वाधिक गुण मिळविलेला असित गुर्जर आणि अक्सा मिर्झा यांना कै. ड .बाबूराव पांगारकर स्मृती मेरिट शिष्यवृत्ती देऊन सन्मानित करण्यात आले. यासोबतच महाविद्यालयामधील पीएचडी प्राप्त विद्यार्थ्यांचा देखील सत्कार करण्यात आला. यामध्ये डॉ.अर्चना अवघड, डॉ.रवींद्र मराठे,डॉ. मीनाक्षी काळे,डॉ.राजू डांगे यांचा सहभाग होता. त्याचप्रमाणे सेटआणि नेट परीक्षा उत्तीर्ण करणाऱ्या मोना तायडे , रेणुका तळोकार, हेमलता आत्राम, वैभव इंगळे यांना मान्यवरांनी सन्मानित केले. अभिजीत खोत,खुशबू झांझोटे, आणि प्रीती डोंगरे यांची जेएमएफसी न्यायाधीश पदी निवड झाल्याबद्दल मान्यवरांनी सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख, संचालन डॉ.अर्चना अवघड यांनी केले. यावेळी व्यासपीठावर डॉ.एन.के.रामटेके,डॉ.राजेश पाटील, प्रा. संदीप वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# 'समता दौड' मध्ये धावले विद्यापीठ व महाविद्यालयाचे हजारो विद्यार्थी-विद्यार्थीनी

## समता सप्ताह निमित्त पंचवटी ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत समता दौड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

समता सप्ताहनिमित्ताने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने आयोजित समता दौडमध्ये विद्यापीठ प्राधिकारिणी सदस्य, प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचायांसह विद्यापीठ तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थीनी सहभाग घेतला. डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख पुतळा, पंचवटी चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक दरम्यान ही 'समता दौड' काढण्यात आली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे मार्गदर्शनाखाली समता दौडचे आयोजन करण्यात



आले. यावेळी हिरवी झेंडी दाखवून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला डॉ. ढोरे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. दौड दरम्यान श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय येथे समता सप्ताहनिमित्त महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख व महात्मा फुले यांच्या प्रतिमांना गुलाबपुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ. अंबादास कुलट, डॉ. आंबेडकरर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड, डॉ. रविंद्र मुन्द्रे, डॉ. सुभाष गावंडे, डॉ. अर्चना बोबडे, डॉ. जागृती बारब्दे, दिल्ली येथील डॉ. प्रशांत रोकडे, विद्यापीठ रा.से.यो. संचालक डॉ. निलेश कडू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, डॉ. दादाराव चव्हाण, श्री राहुल नरवाडे, डॉ. पंजाबराव देशमुख केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे, डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाचे डॉ. रत्नशील खोब्रागडे, डॉ. राजेश मिरगे, डॉ. मनिष गवई, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, श्री संदीप त्रिपाठी, आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

# शिरजगाव मोझरी येथे गुरु शिष्य जयंती सोहळा संपन्न

## रवी मानव आणि मनोज अंबडकर यांचे व्याख्यान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२शिरजगाव मो.**

शिरजगाव मोझरी येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीचे अर्थात गुरु शिष्य जयंती सोहळाचे आयोजन करण्यात आले होते.महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते मा रवी मानव हे कार्यक्रमाचे अध्यक्ष तर मुख्य वक्ते म्हणून मा.मनोज अंबाडकर होते. तर शिरजगाव मोझरी चे सरपंच निरंजन भाऊ कडू, सौ शारदाताई देवघरे पोलीस पाटील शिरजगाव, सौ उमाताई अंबलकर क्रांतीज्योती ब्रिगेड जिल्हाध्यक्ष, दीपक तिखे क्रांतीज्योती ब्रिगेड जिल्हा महासचिव, डॉ.छायाताई मानव, डॉ. सुधाकर डेहनकर, किरण खवले प्रफुल्ल उमप, पत्रकार विजय क्षिरसागर आदींची उपस्थिती होती.



महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजातील सर्वच क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे मी फूल असे साहित्य निर्माण करून समाजाला दिशा देण्याचे कार्य केलेले आहे. त्यांचाच वसा पुढे चालू येत महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारांना भारताच्या संविधानामध्ये स्थान देऊन त्याला संविधानिक दर्जा बहाल करून घेण्याचे कार्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी केले. या दोन्ही महापुरुषांनी देशावर अनन्य साधारण उपकार केले असल्याची भावना मनोज अंबाडकर यांनी आपल्या प्रबोधनातून बोलताना व्यक्त केली.यानंतर रवी मानव यांचे अध्यक्ष भाषण पार पडले अंधश्रद्धा, रूढी परंपरा, जातीयवाद या सर्व विषयावर चौफेर प्रबोधन करत त्यांनी उपस्थितांची मने जिंकली. सर्व प्रकारच्या शोषणाचे कारण हे अविद्या आहे म्हणून आपण विद्या घेऊन विद्यावंत व्हावे असा विचार महात्मा ज्योतिराव फुले यांनी दिला आणि शिक्षणाची गंगा तुमच्या आमच्या दारापर्यंत आणली परंतु आज जिल्हा परिषदेच्या शाळा झपाट्याने बंद होत आहे याकडे अर्थसंकल्पामध्ये कुठलीही विशेष तरतूद करण्यात येत नाही ज्यामुळे गोरगरिबांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळेल असे झालेले आहे अशी खंत यावेळी रवि मानव यांनी व्यक्त केली .

या उत्सवाच्या यशस्वीतेसाठी गावकऱ्यांनी कष्ट घेतले. महात्मा फुले उत्सव समिती- अध्यक्ष- अक्षय पाचघरे, उपाध्यक्ष- नवीन जळीत, सचिव- ऋषिकेश गाडगे, सहसचिव - सागर बेले, कोषाध्यक्ष - प्रणव पाचघरे, संघटक- सागर होले, सहसंघटक- महेश अडसड, कु.यशस्वी खेरडे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन - राणी कडू, क्षितिजा गाडगे.सर्व सदस्य गण, समस्त गावकरी मंडळी जय ज्योती जय क्रांती व राष्ट्रवंदना घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# वेळापूरचे चमत्कारी हनुमान मंदिर : रडत येणारा हसत जातो : मंदिरात आज विविध कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२वरुड**

चमत्कारी हनुमान मंदिर म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध असलेले वेळापूर येथील हनुमान मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान असून रडत येणारा हसत जातो अशा येथील अख्याईका आहे.तालुक्यातील वेळापूर येथे पुरातन हनुमानजीचे मंदिर आहे. वर्धा नदीच्या तिरावर असलेल्या या मंदिरात परिसरासह पंचक्रोशीतील भाविकांची सतत मंदियाळी असते.वेळापूर हे गाव गट ग्रामपंचायतिचे असून पूर्वी गावातच हे मंदिर होते. मात्र १९९१ साली आलेल्या महापुरामुळे वेळापूर या गावाचे पुनर्वसन झाले. मात्र गावातील पुरातन हनुमानजीचे मंदिर त्या ठिकाणी कायम राहिले. आलेल्या महापुरात सर्व गाव



उद्धवस्त झाले, मात्र मंदिराला कोणतीही हानी झाली नसल्याचे संगितले जाते. त्यानंतर या मंदिराच्या जिर्णोद्धाराचे काम ग्रामस्थ तसेच भाविकांच्या मदतीने सुरु झाले. या मंदिरात दरदिवशी भाविकांची मोठी गर्दी असते.रडत येणारा हसत बाहेर जातो अशी येथील आख्याईका आहे. व दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्र म्हणून या मंदिरास मिळणाऱ्या निधीतून या मंदिराचा विकास सुरु आहे. नागपूर जिल्ह्यातील खैरगांव येथील सीताराम सरोदे यांनी या मंदिरासाठी साडेसहा एकर जमीन दान म्हणून दिली असून या परिसरात विस्तीर्ण मंदिर सुशोभीत झाले आहे. या मंदिराच्या कार्यकारिणीकडून दर शनिवारी महाआरती व महाप्रदाचे आयोजन केले जाते. या मंदिराच्या व्यवस्थापनासाठो अध्यक्ष अनिल चौधरी, उपाध्यक्ष किशोर काळमोरे, सचिव सुनील गुल्हाने, सहसचिव प्रकाश वांदे, कोषध्यक्ष विनायक घोरमाडे, सदस्य गिरीष कराळे, नरेद्र खुटेटि, विष्णू राऊत, सुरेश टुले आदी प्रयत्न करीत आहेत.

# 'बोलो वीर हनुमान की जय', 'जय बजरंगबली' अशा घोषणांनी दुमदुमली हनुमान मंदिरे

## सर्वत्र बजरंगाचा जयघोष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

बजरंगबली अर्थात हनुमान यांचा जयजयकार आज साऱ्या अमरावती शहरासह जिल्ह्याभर होता. शहर आणि ग्रामीण भागातील परिसरात हनुमान जयंती मोठ्या भक्तिभावाने साजरी करण्यात आली. धार्मिक कार्यक्रमांसह महाप्रसादाचे आयोजनही ठिकठिकाणी करण्यात आले होते. दरम्यान, भानखेडा रोड येथील हणून गढी असणाऱ्या मारुतीच्या दर्शनासाठी हजारो भाविकांची उपस्थिती होती.

रविनगर परिसरात असलेल्या हनुमान मंदिरात पहाटेपासून भक्तांची रीघ लागली होती. मारुतीरायाला नतमस्तक होऊन वंदन केले जात होते. दुपारी जन्मकाळ साजरा करण्यात आला. तसेच कीर्तन, भजनाचा कार्यक्रमही झाला. सायंकाळपर्यंत भक्तांची रीघ होती. तसेच पंचमुखी मारुती मंदिरात गेल्या चार दिवसांपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे महापूजा झाली. त्यानंतर जन्मकाळ झाला. कीर्तन, भजनाचे कार्यक्रम झाल्याने सारे वातावरण भक्तिमय होते. अमरावती मध्ये एकच पंचमुखी मारुती मंदिर असल्याने भक्तांची गर्दी होती.शहरासह ग्रामीण भागातील हनुमान मंदिरात सुद्धा आज मोठ्या प्रमाणात गर्दी पहावयास मिळाली.आज दिवसभर सर्वत्र उत्साहाचे वातावरण पहावयास मिळाले तर ठिकठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.


# तारूबांदा जंगलातील कांद्री बाबा मेळघाटातील श्रद्धेचे केंद्र

## शनिवार व मंगळवारी भाविकांची मोठी गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२धारणी**

मेळघाटातील तारूबांदा गावापासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर घनदाट जंगलाच्या मध्यभागी असलेले सुप्रसिद्ध कांद्रीबाबा हे ठिकाण मेळघाटातील श्रद्धा, भक्तों आणि नियमांचे अद्वितीय केंद्र आहे. घनदाट जंगलात प्राचीन मारुतीचे मंदिर असून हे मंदिर कांद्रीबाबा म्हणून प्रसिद्ध आहे. मास्तीचे जागृत देवस्थान म्हणून त्याची ख्याती आहे. येथे कांद्रिबाबा

हनुमान साक्षात अवतरले असल्याचे मानले जाते.वाघ्रप्रकल्पाच्या कोर जंगलात असल्याने या मंदिरात फक्त प्रत्येक शनिवार आणि



मंगळवारी भाविकांना दर्शनासाठी वनविभागाकडून जाण्याची परवानगी मिळते. शनिवार व मंगळवार येथे मोठ्या प्रमाणावर भाविक उपस्थित राहतात. कांद्रीबाबा हे केवळ देवतेचे रूप नाही, तर मेळघाटातील जनतेच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू ठरले आहे. येथे येणारा प्रत्येक भाविक एक वेगळीच शांतता, ऊर्जा आणि भक्तिभाव अनुभवतो. निसर्गाच्या सानिध्यात भक्तीचा हा संगम आजही गावकरी आणि पर्यटक यांना आकर्षित करीत आहे. कांद्रीबाबांना हलवा आणि बाटीपासून बनवलेला रोट अत्यंत प्रिय मानला जातो शनिवार आणि मंगळवारी चुलीवर बनवलेला प्रसाद भाविक बाबांना अर्पण करतात आणि उपस्थित भक्तांमध्ये वाटतात. ही परंपरा अनेक दशकांपासून अखंड सुरू आहे.आज हनुमान जयंती निमित्य विविध कार्यक्रमांचे आयोजन मंदिर समिती च्या वतीने करण्यात आले होते.

# चांगापूर जागृत हनुमान मंदिरात 'हनुमान जयंती उत्सव'

## बुंदीच्या लाडूचा भोग, पहाटेपासून मध्यरात्रीपर्यंत वितरित होतो महाप्रसाद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

हनुमान जयंतीनिमित्त अमरावती शहरालगत असणाऱ्या चांगापूर येथील जागृत हनुमान मंदिरात पहाटे चार वाजता श्री हनुमानची पंचोपचार विधीद्वारे पूजा करून अभिषेक करण्यात आला. पहाटे आरती झाल्यावर पाच वाजता भाविकांना महाप्रसाद वितरित करण्यात आला.

चांगापूर येथील हनुमान मंदिरात आज पहाटे साडेतीन वाजल्यापासून हनुमानाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी उसळली. तर चार वाजता मंदिरातील पुजाऱ्यांनी मंत्रोपचारद्वारे हनुमंतला अभिषेक केला. तर संपूर्ण मंदिर विविध फुलांचे हार आणि फुग्यांनी सजविण्यात आले आहे.

पहाटे अभिषेक केल्यावर हनुमानला बुंदीचा लाडू आणि पेढ्याचा भोग लावण्यात आला. सकाळी पाच वाजता आरती झाल्यावर वरण, भात, भाजी, पोळी, भजे, बुंदी असा महाप्रसादाचा नैवेद्य हनुमंताला दाखवण्यात आला. पहाटे आरती झाल्यावर ५ वाजल्यापासून मंदिर परिसरात महोत्सवाला सुरुवात झाली. पहाटे मंदिरात आलेल्या भाविकांनी महाप्रसाद घेतला. मंदिर परिसरात दिवसभर महाप्रसाद वितरित केला जातो. रात्री एक ते पुढे दोन वाजेपर्यंत असा सलग १८ ते १९ तास महाप्रसाचं वितरण या ठिकाणी केलं जातं. अनेक भाविक महाप्रसाद वितरणासाठी सेवा देतात.अमरावती जिल्ह्यातील जागृत हनुमान मंदिरांपैकी एक असणाऱ्या चांगापूर येथील हनुमानाच्या दर्शनासाठी अमरावती शहरासह, दर्यापूर, चांदूर बाजार, अचलपूर या भागातून अनेक भाविक दर्शनासाठी येतात. पहाटे चार वाजल्यापासून रात्री दोन वाजेपर्यंत मंदिरात भाविकांची गर्दी राहते. यावर्षी पहिल्यांदा



वृद्ध भाविकांना कार पार्किंग परिसरापासून मंदिर परिसरात आणण्यासाठी ई-कराची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती, मंदिरातील पुजारी शाम शर्मा यांनी दिली.

हनुमान जयंतीच्या प्रवावर चांगापूर हनुमान मंदिरात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आलं आहे. उन्हाळ्यात रक्ताचा तुटवडा भासत असल्यामुळं मंदिर संस्थांच्या वतीनं हा खास उपक्रम राबविला जातो. हनुमंताच्या दर्शनासाठी येणारे अनेक भाविक या शिबिरात रक्तदान करतात.

जहांगीरपूर आणि विरगव्हाण येथील मंदिरातही उत्सव : हनुमान जयंती निमित्त शहरातील प्रत्येक भागात असणाऱ्या हनुमान मंदिरात मोठा उत्सव आयोजित केला जातो. जागृत हनुमान अशी मान्यता असणाऱ्या चांगापूर येथील हनुमान मंदिरासह तिवसा तालुक्यात येणाऱ्या श्री क्षेत्र जहांगीरपूर आणि विरगव्हाण येथील जागृत हनुमान मंदिरात देखील हनुमान जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

# नागपूरच्या उमरेड एमआयडीसीतील कंपनीत स्फोटानंतर आग, पाच कामगारांचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२नागपूर**

उमरेड एमआयडीसीतील कंपनीला शुक्रवारी आग लागली होती. या कंपनीत अल्युमिनियम फॉइल आणि पावडर तयार केली जाते. या कंपनीत शुक्रवारी सायंकाळी स्फोट झाला होता. स्फोटानंतर भीषण आग लागली. स्फोटात काही कामगार जखमी झाले होते. तर अनेक कामगार हे बेपत्ता होते. यातील पाच कामगारांचा मृत्यू झाल्याची माहिती नागपूर ग्रामीणच्या पोलीस अधीक्षकांनी दिली.



उमरेर येथील अल्युमिनियम फॉइल कारखान्यात झालेल्या स्फोटात पाच जणांचा मृत्यू झालाय. यातील दोन जणांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर बेपत्ता झालेल्या ३ जणांच्या मृत्यूची पुष्टी झाली आहे. हा स्फोट शुक्रवारी रात्री झाला असून, त्यानंतर कंपनीत भीषण आग लागली. याबाबतची माहिती नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यानी दिली. मृत्यूचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. जखमी कामगारांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमींची तब्येत चिंताजनक आहे. निखिल नेहारे (२४), अभिषेक जांगड (२०), निखिल शेंडे (२५), पियुष दुर्गे (२१) आणि सचिन मेश्राम (२६) अशी मृतांची नावे आहेत. हे सर्व कामगार उमरेड येथील रहिवासी आहेत.

कंपनीत अल्युमिनियम पावडर असल्यानं आग विझवण्यात मोठी अडचण आली. संपूर्ण पावडर जळून खाक झाल्यानंतर आग आटोक्यात आली, अशी माहिती, उमरेडचे पोलीस निरीक्षक धनाजी जळक यांनी दिली. नागपूर येथून काही अग्निशमन दलाच्या गाड्या उमरेडसाठी पाठवण्यात आल्या होत्या.


या घटनेची माहिती समजल्यानंतर अग्निशमन दलासह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. महत्त्वाचे म्हणजे, कंपनीत अल्युमिनियम पावडर असल्यानं आग विझवण्यात अडचणी आल्या. अल्युमिनियम पावडर पूर्णतः जळल्यानंतर आग आटोक्यात आली. कंपनीत स्फोट कशामुळं झाला याबाबत अद्याप कोणतीही माहिती पुढे आलेली नाही.स्फोट झाला त्यावेळी कंपनीत १५० कामगार कामावर होते, अशी माहिती पुढे आलेली आहे. स्फोट होताच ते बाहेर पळाल्याने त्यांचा जीव वाचला. मात्र, ज्या युनिटमध्ये हा स्फोट झाला तिथले कामगार गंभीर भाजले.

# भातकुली पंचायत समिती मधील कर्मचारी दुपारी आरामाला घरी जातात का?सामान्य नागरिकांचा प्रशासनाला प्रश्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ अमरावती**

भातकुली तालुक्यातील काही नागरिक काही कामानिमित्त पंचायत समिती मध्ये शुक्रवारी दुपारच्या सुमारास आले असता पंचायत समिती कार्यालय येथे एकही अधिकारी कार्यालयात उपस्थित नव्हते त्यामुळे तालुक्यातील नागरिकांना आल्या पावली परत जावे लागत असल्याचे चित्र आज पंचायत समिती भातकुली येथे पहावयास मिळाले.

या नागरिकांनी जिल्हा प्रशासनास प्रश्न विचारला केला की पंचायत समिती येथील अधिकारी कर्मचारी थंड हवेत घरी झोपा घेतात का? पंचायत समितीच्या शुकशुकाट पाहण्यास मिळाला जणू काही आज सरकारी सुट्टीच आहे की काय असं चित्र संपूर्ण पंचायत समिती दिसून आले समितीचे बिडीओ हे हजर दिसले



नाहीत. विस्तार अधिकारी दिसले नाहीत, शिक्षण अधिकारी तिथे उपस्थित दिसले नाही, कृषी अधिकारी पंचायत हे अधिकारी सुद्धा आपल्या ऑफिस मध्ये हजर नव्हते, तसेच पाणीपुरवठा अधिकारी हे सुद्धा आपल्या कॅबिनमध्ये हजर नव्हते म्हणजे याचा अर्थ असा होतो की , आज त्यांनी सार्वजनिक सुट्टी म्हणून आपल्यासाठी घोषित केली असावी

पंचायत समितीतील भातकुली आजच्या वातावरणातून दिसुन येते ,म्हणून आम्हाला भातकुली पंचायत समितीतुन काम न करता रिकाम्या हाताने वापस यावे लागले या उन्हातान्हात आम्ही आमच्या गावावरून येथे गावातील काहि सुचना घेऊन आलो असता, पण हे अधिकारी आपल्या कामात हय गय व कामचुकारपणा करत असताना दिसत आहेत. आणि दुपारच्या वेळेत आपल्या घरी जाऊन झोपा घेत आहेत असे आढळून येत आहे. म्हणून माझी आपल्या सरकारला एकच विनंती आहे कि, या काम न करता पगार घेतात याच्यांवर योग्य दंडात्मक कारवाई करण्यात यावी आपला.

# आता 'शासन आपल्या मोबाईलवर' राज्यातील पहिलाच उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२यवतमाळ**

शासन आपल्या दारी सारख्या उपक्रमामुळे शासनाच्या विविध योजना थेट नागरिकांपर्यंत पोहोचवल्या. पण यवतमाळ जिल्हा प्रशासनाने त्याही पुढे जाऊन 'शासन आपल्या मोबाईलवर' हा उपक्रम सुरू करून अनेक शासकीय योजना, उपक्रम, प्रमाणपत्र थेट जनतेच्या हातात एका क्लिकवर आणले आहेत. जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेऊन सुरू केलेला हा राज्यातील पहिलाच उपक्रम आहे.



जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या संकल्पनेतून 'शासन आपल्या मोबाईलवर' हा उपक्रम राबविण्यात येत आहे.या उपक्रमाचे आज शुक्रवारी पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते लोकार्पण झाले. भविष्यात हा उपक्रम संपूर्ण राज्यात सुरू करणार असल्याची पालकमंत्री संजय राठोड यांनी यावेळी दिली.

या उपक्रमांतर्गत प्रशासनाच्या वतीने अधिकृत यु-ट्यूब चॅनल तयार करण्यात आले आहे. या चॅनेलवर महसूल विभागातील जमिनीची नोंदणी, फेरफार नोंदी, अकृषक परवानगी, विविध दाखले, वनहक्क कायदा, रस्ते संबंधी वाद, शिधापत्रिका, जमीन प्रकार, सातबारा, वारस नोंदी, भूसंपादन प्रक्रिया, मतदार नोंदणी प्रक्रिया, कलम १५५ दुरुस्ती पद्धत, अतिक्रमण नियमित करणे, नैसर्गिक आपत्ती, जन्म मृत्यूची उशिरा नोंदणी, शेती घेताना घ्यावयाची दक्षता, सहधारकांमध्ये हिस्से वाटप, अर्धन्यायिक प्रक्रिया, सामाजिक अर्थसहाय्य योजना, पोटखराब जमीन वापरात आणणे, गौणखनिज संदर्भात माहिती, अदिवासी जमिनींचे व्यवहार अशा विविध विषयांची माहिती चॅनेलच्या माध्यमातून नागरिकांना आपल्या मोबाईलवर उपलब्ध होणार आहे. पुढील टप्प्यात विविध शासकीय विभागाच्या योजना देखील उपलब्ध होणार आहे. संबंधित विषयाची सविस्तर माहिती उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांनी स्वत: व्हिडीओच्या माध्यमातून दिली आहे. विषय समजून सांगतांना त्याचे बारकावे, नियम, अटी, दक्षता, काळजी यावर देखील माहिती उपलब्ध होणार आहे. त्यामुळे घरबसल्या महसूलसह विविध विभागांच्या किचकट प्रक्रिया देखील नागरिकांना सोप्या भाषेत अधिकाऱ्यांकडून माहिती होतील.

जिल्हाधिकाऱ्यांनी अगदी काही दिवसात हा उपक्रम सुरु केला. जिल्ह्यातील नागरिकांना अधिकाधिक सेवा, पारदर्शक आणि गतिमानपणे मिळण्यासोबतच त्यांचा पैसा, वेळ आणि परिश्रम वाचविण्यासाठी हा नाविण्यपूर्ण उपक्रम उपयोगी पडणार आहे. हा उपक्रम अतिशय चांगला असून सोप्या भाषेत नागरिकांना विविध योजना, उपक्रम आत्मसात होईल, असे पालकमंत्री राठोड यावेळी म्हणाले. प्रशासन गतिमान व लोकाभिमुख होण्यासोबतच या उपक्रमामुळे सर्वसामान्य नागरिक व प्रशासनामध्ये सुसंवाद वाढेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. यावेळी जिल्हाधिकारी विकास मीना, अप्पर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, तहसिलदार आदित्य शेंडे आदी उपस्थित होते.

# यंदा २१०० कोटींच्या पीककर्ज वाटपाचे टार्गेट ! पिककर्ज वाटप दरात १० ते १५ टक्क्यांनी वाढ

## डीएलबीसी द्वारा पीककर्ज वाटपाचे दर निश्चित : कापसाला ६९ हजार, सोयाबीनला ६५ हजार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

जिल्हास्तरीय बँकर्स समितीच्या (डीएलबीसी) बैठकीत यावर्षी वाटप करण्यात येणाऱ्या पीककर्जाचे हेक्टरी दर निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार यंदा कापसाला ६९ हजार, तर सोयाबीनला ६५ हजार रुपयांचे पीककर्ज मिळेल. याशिवाय हंगामात २१०० कोटींच्या पीककर्ज वाटपाचे टार्गेट निश्चित करण्यात आले आहे. तसा प्रस्ताव एसएलबीसीला देण्यात आला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली 'डीएलबीसी'ची बैठक घेण्यात



आली. सभेमध्ये शेतकरी प्रतिनिधी नरेंद्र शिंगणे यांनी उत्पादन खर्च वाढल्याने सर्व पिकांच्या कर्ज वाटप दरात १० ते १५ टक्क्यांनी वाढ करावी, अशी सूचना केली होती. यावर चर्चेअंती पीककर्ज वाटपाच्या दरात १० टक्क्यांनी वाढ करण्याची सूचना जिल्हाधिकारी सौरभकटियार यांनी केली. त्यानुसार यावर्षी खरीप व रब्बी हंगामांसाठी एकत्रित २१०० कोटींचे पीक कर्ज वाटपाचे टार्गेट

### पीक कर्ज वाटपाचे हेक्टरी दर (रु.)

| | |
|---|---|
| कपाशी (जिरायती) | ६६,५०० ते ६९,८०० |
| संकरित ज्वारी | ३२,९०० ते ३५,१०० |
| तूर | ४५,७०० ते ४७,९०० |
| सोयाबीन | ५५,९०० ते ६७,३०० |
| गहू | ४८,४०० ते ५०,८०० |
| हरभरा (जिरायती) | ३४०० ते ४८२०० |

निश्चित करण्यात आले. राज्यस्तरीय तांत्रिक गटाकडे मंजुरीसाठी पाठविण्याचा निर्णय झाला. यामध्ये खरिपासाठी १६५० कोटी, तर रब्बीसाठी ४५० कोटी कर्ज वाटपाचा बँकनिहाय आराखडा निश्चित झाल्याचे अग्रणी बँकेच्या व्यवस्थापकांनी सांगितले.

**राज्यस्तर समितीला प्रस्ताव**

आर्थिक वर्ष संपल्यामुळे एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेद्वारे नियमित खातेदारांना यंदाच्या खरिपासाठी पीककर्ज वाटप सुरू करण्यात आले. दरम्यान, जिल्हा समितीने प्रस्तावित केलेला बँकनिहाय पीक कर्ज वाटप लक्ष्यांकाचा प्रस्ताव मंजुरीसाठी राज्य समितीला पाठविण्यात आला आहे.

**पीककर्ज वाटपाचे बँकांनिकाय लक्षांक**

'एसएलटीसी'कडे मंजुरीसाठी पाठविलेल्या प्रस्तावानुसार यावर्षी खरिपासाठी राष्ट्रीयीकृत बँकांना ८७९ कोटी, ग्रामीण बँकांना २१ कोटी, तर जिल्हा बँकेला ७५० असे एकूण १६५० कोटी पीककर्ज वाटपाचे टार्गेट निश्चित करण्यात आलेले आहे. यामध्ये 'एसएलबीसी'मध्ये चर्चेनुसार काही प्रमाणात कमीअधिक होण्याची शक्यता असल्याचे एलडीएम श्याम शर्मा यांनी सांगितले. आता काहीच दिवसांत खरीप हंगाम सुरू होणार आहे.

# राज्याला पुढील चार दिवस अवकाळीचा तडाखा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

राज्याचा हवामानात सातत्याने बदल घडून येत आहेत. हवामान खात्याने पुन्हा एकदा राज्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे. दरम्यान, हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार राज्यात पुढील चार दिवस अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे.



विदर्भ आणि मराठवाड्यात उष्णतेचा दाह वाढतच चालला आहे. विदर्भातील शहरांमध्ये तापमान ४४ अंश सेल्सिअस पलीकडे गेले होते. अजूनही तापमानाचा पारा उंचावला असताना दरम्यानच्या काळात अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यानंतर तापमान घसरले, पण अवकाळी संपताच पुन्हा एकदा तापमानाने उसळी घेतली असताना आता पुन्हा एकदा अवकाळी पावसाचे संकट महाराष्ट्रावर डोकावत आहे. विदर्भ, मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रात अवकाळीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

हवामान खात्याने हिंगोली जिल्ह्याला ढगांच्या गडगडाटासह पावसाचा इशारा दिला असून, लातूर, धाराशिव, परभणी, छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड या भागांमध्ये पुढच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भ आणि मराठवाड्याला अवकाळीचा इशारा देण्यात आला असला तरीही उकाडा मात्र कायम असणार आहे.

**तापमानात फारशी घट नाहीच**

राज्यात तापमानाच चढ-उतार सुरू असले तरीही त्यात फारशी घट होत नाही. त्यामुळे पाऊस आला तरीही नागरिकांना फारसा दिलासा नाही. एकंदरच आठवड्याच्या शेवटीसुद्धा हवामानात चांगलाच बदल होत आहे. त्याचे परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून आरोग्याच्या वेगवेगळ्या तक्रारी समोर येत आहे. त्यामुळे याची काळजी घेण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

# जनआरोग्य योजनेचे कार्ड 'ईएसआयसी'मध्येही चालणार

## सार्वजनिक आरोग्यसेवेचा होणार विस्तार; अनेकांना मिळणार लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून ७ एप्रिल रोजी राज्यातील कामगार विमा योजना (ईएसआयसी) अंतर्गत कार्यरत रुग्णालयांमध्ये महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेचा शुभारंभ करण्यात आला आहे. या निर्णयामुळे आता केवळ नोकरी करणाऱ्या कामगारांपुरतीच मर्यादित असलेली ईएसआयसी रुग्णालये सर्वसामान्य गरीब जनतेसाठीदेखील खुली झाली आहेत.

नव्या व्यवस्थेमुळे जनआरोग्य योजनेच्या कार्डधारकांना १३५६ प्रकारच्या गंभीर आजारांवर मोफत उपचार, शस्त्रक्रिया व औषधोपचार मिळणार आहेत. प्रारंभी काही ईएसआयसी रुग्णालयात स्त्री रुग्णांसाठी स्वतंत्र सेवा उपलब्ध करून दिली जाणार असून, त्यानंतर सर्वांनाच ही सुविधा मिळणार असल्याची माहिती आहे. या योजनेंतर्गत प्रारंभिक टप्प्यात स्त्री रुग्णांना प्राधान्य दिले जाणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्याने अन्य



रुग्णांनाही आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे.महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेचा कार्ड हे योजनेचा घेण्यासाठी आवश्यक आहे. या योजनेंतर्गत, वैध रेशन कार्ड, (पिवळे, केसरी, अंत्योदय, अन्नपूर्णा) आणि छायाचित्रासह ओळखपत्र (आधार कार्ड, मतदार कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना) असणे आवश्यक आहे.राज्य शासनाच्या या निर्णयामुळे आरोग्य सुविधा आता अधिक सुलभ आणि सामर्थ्यवान होणार आहेत. गंभीर आजारांवर मोफत उपचारांसह हृदयविकार, कॅन्सर, मेंदुविकार, डायलिसिस, सर्जरी, प्रसूती, शस्त्रक्रियादेखील करून घेता येणार आहेत. त्यामुळे उपेक्षित घटकाला मोठा दिलासा मिळणार आहे. यामध्ये १ हजार ३५६ आजारांवर या योजनेंतर्गत मोफत उपचार केले जाणार आहेत. खासगी रुग्णालयांपेक्षा कमी गर्दी, अधिक सुविधा आणि दर्जेदार आरोग्यसेवा गोरगरिबांना थेट मिळणार आहेत. यामुळे गोरगरीब रुग्णांचा वेळ आणि पैसाही वाचणार आहे. जागतिक आरोग्य दिनानिमित्त ७ एप्रिल रोजी शासनातर्फे ही योजना राबविण्याबाबची घोषणा करण्यात आली आहे.कर्मचारी राज्य विमा निगमच्या वैद्यकीय लाभ परिषदेने या योजनेत सहभागी होण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे कामगार विमा रुग्णालय सर्वच घटकांना सेवा पुरविणार आहेत. दरवर्षी पात्र कुटुंबाला पाच लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य विमा सेवा हे उद्दिष्ट आहे.

> एकीकृत आयुष्मान, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेतून राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे असंख्य गरीब घटकांना आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहेत.
>
> **- डॉ. अंकिता मटाले, जिल्हा समन्वयक**

# क्रीडा गुण सवलतीसाठी २१ एप्रिलपर्यंत मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

फेब्रुवारी मार्च २०२५च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता दहावी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र बारावी परीक्षेतील खेळाडू विद्यार्थ्यांचे सादर करण्यासाठी २१ एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षेसाठी क्रीडा गुण सवलतीचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडून ऑनलाइन १५ एप्रिलपर्यंत स्वीकारावे, असे कळवले होते. १४ एप्रिलपर्यंत आपले सरकार सेवा पोर्टल नियमित देखभालीसाठी बंद असेल. त्यामुळे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा गुण सवलतीचे प्रस्ताव ऑनलाइझ संबंधित विभागीय मंडळाकडे सादर करण्यासाठी २१ एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे.